
• पंढरपूर • शुक्रवार, २४ जानेवारी २०२५
• किंमत ₹ ४ • पाने : ८

# पंढरी संचार

pandharisanchar.com
RNI-MAH-MAR/1499/2000
• वर्ष २९ • अंक - २४४




आदर्श समाज घडवण्यासाठी आईवडीलांचा वाढदिवस साजरा करणे महत्त्वाचे... PII



व्यायामात सातत्य आवश्यक - योग प्रशिक्षिका सुप्रिया शेंबडे PIII

## अखेर कॉरीडॉरला मुहूर्त सापडला

# कॉरिडॉर आराखडा तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात- पालकमंत्री गोरे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना चांगल्या सोयी सुविधा मिळाव्यात म्हणून पंढरपूरमध्ये कॉरिडॉर करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या मार्गदर्शनाखाली कॉरिडॉरचा आराखडा तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात सुरू आहे. लवकरच या कामाचा शुभारंभ होईल अशी माहिती पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.





जयकुमार गोरे यांची सोलापूर जिल्हा पालकमंत्री पदी निवड झाल्यानंतर पहिल्यांदाच गोरे सोलापूर जिल्हा दौऱ्यावर आले आहेत. आज गुरुवारी त्यांनी पंढरपूर येथे येऊन विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतले. यानंतर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, महायुती शासनाने राज्यात विविध योजना लागू केल्यामुळे याचा फायदा नागरिक व महिलांना झाला आहे. यामुळे पुन्हा राज्यात महायुतीची सत्ता आली आहे. पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनाला वर्षाला एक कोटी होऊन अधिक भाविक येतात. यामुळे येणाऱ्या भाविकांना चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी पंढरपुरात कॉरिडॉर करण्यात येणार आहे. या माध्यमातून पंढरपूरचा कायापालट होणार असून विकासाची कामे होणार आहेत. यामुळे मोठ्या प्रमाणावर भाविक येणार असून अर्थकारणाला गती मिळणार आहे. पंढरपूर कॉरिडॉरचा आराखडा तयार करण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या मार्शनाखाली अंतिम टप्प्यात आले आहे.लवकरच या कामाचा शुभारंभ होणार आहे. » पान ३ वर


## » At a Glance

### केळी विकत घेऊन २२ लाखांची फसवणूक



**करमाळा :** केळी विकत घेऊन २२ लाख ६४ हजार रुपयांचे बिल वारंवार मागणी करूनही न देता फसवणूक केल्याचा प्रकार करमाळा येथे घडला आहे. या फसवणूक प्रकरणात तालुक्यातील कंदर व वाशी (मुंबई) येथील व्यापाऱ्यांचा समावेश आहे. राहुल नामदेवराव जगताप (रा. मेन रोड, करमाळा) यांनी फिर्याद दिली. याप्रकरणी दिग्विजय सुभाष मोरे तसेच बावा ग्रुप या कंपनीच्या सोहेल ए. (रा. वाशी मुंबई) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला. पुढील तपास सहायक फौजदार वाडगे करीत आहेत.

### सौंदणे कट परिसरात बिबट्या हल्ला



**मोहोळ :** मोहोळ तालुक्यातील सौंदणे कट परिसरात असलेल्या मोठ्या कॅनल जवळ नितीन पवार यांची वस्ती आहे. बुधवारी पहाटे एक वाजण्याच्या दरम्यान शेळ्यांचा व इतर जनावरांचा ओरडण्याचा आवाज येऊ लागल्याने पवार हे घराच्या बाहेर आले. त्यावेळी बिबट्या सदृश्य प्राण्याने शेळीला पकडले होते व ते ओढत होते. त्यावेळी त्यांनी आरडाओरडा केल्यामुळे तो वन्यप्राणी पळून गेला. मात्र त्या ठिकाणी तीन शेळ्या मृत अवस्थेत पडलेल्याचे त्यांना आढळले.

### आदिनाथचे बिगुल लवकरच वाजणार



**करमाळा :** करमाळा तालुक्यात विधानसभा निवडणुक झाल्यानंतर थंड झालेले राजकीय वातावरण आदिनाथ सहकारी साखर कारखान्याच्या निमित्ताने पुन्हा तापण्याची शक्यता आहे. आदिनाथ सहकारी साखर कारखान्याची निवडणूक पूर्व तयारी सुरु असून प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यासाठी कारखान्याकडून प्रादेशिक सह संचालक यांच्याकडे सादर करण्यात आली आहे. निवडणुकीसाठी खर्च भरण्याबाबत कारखाना प्रशासनाला सूचित केल्यानंतर तत्कालीन अध्यक्ष धंनजय डोंगरे यांनी १० लाख रुपये भरले होते.

### मालवाहू टेम्पोमधून ४६ गोवंश वाहतूक


**करमाळा :** करमाळा शहरातून मालवाहू टेम्पोमधून ४६ गोवंश जनावरे दाटीवाटीने वाहून नेताना करमाळा पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले, असून त्यांच्याविरोधात करमाळा पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. करमाळा शहरातील यशकल्याणी सेवाभवन समोर हा टेम्पो पकडण्यात आला आहे. फिर्यादीवरून करमाळा पोलिसांनी साहिल रियाज कुरेशी आणि सोहेल गफार कुरेशी यांच्यावर विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला असून पो. हे. कॉ. पांडुरंग आरकिले हे पुढील तपास करत आहेत.

## २६ जानेवारीपासून शेतकऱ्यांना फार्मर आयडी देण्यास प्रारंभ


■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** शासनाच्या कृषी मंत्रालयाद्वारे राविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ एकत्रितपणे शेतकऱ्यांना देण्यासाठी अँग्रीटॅक हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. प्रजासत्ताक दिनी 26 जानेवारी पासून शेतकऱ्यांना अँग्रीटॅक प्रकल्प युनिक आयडी देण्यास सुरुवात करण्यात येणार आहे. शासनाने शेतकऱ्यांना आधार कार्ड प्रमाणे स्वतंत्र डिजिटल शेतकरी ओळखपत्र देण्याचा निर्णय घेतला आहे. अॅग्रीस्टॅक योजना या उपक्रमाद्वारे शेतकऱ्यांना डिजिटल सेवांचा वापर करून केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देणे या मागचा उद्देश आहे. महसूल विभागाकडे नमूद शेतकऱ्यांची नावे त्यांची शेती या डेटा सोबतचा वापराद्वारे शेतकऱ्यांची ओळख पटविणारा आधार क्रमांक व त्या आधारे फार्मर आयडी देण्यात येणार आहे.

कृषी क्षेत्रासाठी सर्वसमावेशक डिजिटल पायाभूत सुविधा उभारणे हा अॅग्रीस्टॅक उपक्रमाचा उद्देश आहे. सातबाराचे संगणकीकरण व रिमोट सरसिंग पद्धतीने जमिनीचे संदर्भात धारण झालेले आहे. या सेवा डिजिटल स्वरूपात उपलब्ध होत आहेत. सदरील



उपक्रमासाठी गावनिहाय पथके तयार करण्यात आली आहेत. या पथकाद्वारे शेतकऱ्यांना फार्मर आयडी देण्यास सुरुवात करण्यात आली आहे. यापुढे पी एम किसान अनुदान, पिक विमा, सबसिडी, शेती पीक नुकसान अनुदान, स्वस्त कर्ज, कृषी निर्विष्ठ फार्मर आयडीद्वारे मिळणार आहेत.



## मुख्याध्यापक कट्टीमनींवर निलंबनाची कारवाई

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अक्कलकोट :** मैंदर्गी (ता. अक्कलकोट) येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुलींचे शाळेचे मुख्याध्यापक महांतेश कट्टीमनी यांच्यावर विविध प्रकारचे गंभीर ठपके ठेवून निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार गटविकास अधिकारी शंकर कवितके यांनी केली आहे. अधिक माहिती अशी की, मुख्याध्यापक कट्टीमनी हे मागील दोन वर्षांपासून सदर ठिकाणी कार्यरत होते.

## ‘बोध रामकथेचा’ जर्मनीत डंका !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** भारतीयांचे संस्कृती प्रेम कोठेही वास्तव्यास गेले तरी चिरस्थायी राहते याची अनेक उदाहरणे प्रत्यक्षात पाहायला मिळत असतानाच जर्मनीतील एक उदाहरण समोर येताना दिसते.

भागवताचार्य बाळासाहेब बडवे यांनी लिहिलेल्या ‘बोध रामकथेचा’ या ग्रंथाचे वाचन गेली चार दिवसापासून युट्युबच्या एका लिंकवर सुरु झाले असून रोज सकाळी ७ वाजता त्याचे प्रसारण होताना दिसते. कविवर्य श्री. रवि सोनार यांच्या प्रयत्नांतून ही लिंक सुरु झाली असल्याने त्याचे वाचन प्रा. दीपक द. निकते हे करीत असून जर्मनीतील एका मोठ्या शहरात कुटुंबासह वास्तव्यास असलेले आयटी क्षेत्रातील तज्ञ व सातारा येथील मुळ रहिवाशी असलेले श्री.सचिन माळवदे हे आपल्या कुटुंबासह रोज सकाळी ७ ला ‘बोध रामकथेचा’ याचे श्रवण करीत आहेत. आज जर्मनीहून प्रा. निकते यांना दूरध्वनी करुन माळवदे कुटुंबियांनी निकते यांचे अभिनंदन केले.



प्रा.दीपक द.निकते कवि रवि सोनार

श्री.माळवदे यांनी भारतातील सुमारे १५० कुटुंबियांना ही लिंक जोडून दिली असल्याने जर्मनीतील अनेक कुटुंबात ‘बोध रामकथेचा’ ही कथा ऐकली जात असल्याचे श्री. माळवदे यांनी प्रा. निकते यांना सांगितले. भारतीय संस्कृतीचे प्रेम आणि दिव्य अनुभूती देणाऱ्या अनेक कथांचा विसर भारतीयांना पडत नाही याचे श्री.माळवदे कुटुंब एक उदाहरण मानावे लागेल.

## महिलांना एकाच योजनेचा लाभ मिळणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** शासनाकडून संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजना राबविण्यात येत आहेत. ज्यांना लाडकी बहिणीचे पैसे मिळतात. त्यांना आता निराधारचे पैसे मिळणे बंद होणार आहे. त्या संदर्भात कार्यवाही जिल्हा प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे. यामुळे आता महिलांना एकाच योजनेचे पैसे मिळणार आहेत.

शासनाकडून संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थी महिलांना पंधराशे रुपये दिले जातात. मात्र लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतला असेल तर निराधार योजनेचा लाभ मिळणार नाही. यासाठी आधार




बँक पासबुक जमा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखाच्यावर आहे. अशा लाडक्या बहिणींना या योजनेचा लाभ मिळणार नाही. यामुळे आता ज्या महिलांना संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ निराधार योजनेचा लाभ मिळतो त्यांना एकाच लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळणार आहे.

## पायाभूत सुविधा व्यक्तीकेंद्रीत असू नयेत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** मी सोलापूर शहरात नियुक्त झाल्यापासून अनेक प्रलंबित विषय मार्गी लावण्याचा प्रयत्न केला. हे काम माझ्या शहरासाठी करणे गरजेचे आहे असे जेंव्हा वाटते तेंव्हा मार्ग निघतात. माझी बदली कधीही होऊ द्या शेवटच्या दिवसापर्यंत इथले प्रकल्प कसे मार्गी लागतील आणि ते कायमस्वरूपी कसे राहतील हे पाहणे महत्वाचे आहे. पायाभूत सुविधा व्यक्तीकेंद्रित असू नयेत. कोणीही कमिशनर आले किंवा गेले तरी त्या सुविधा कायम राहिल्या पाहिजेत त्या बंद पडू नयेत. त्याचा उपयोग लोकांना झाला पाहिजे असे सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्त शीतल तेली उगले यांनी आज सांगितले.

## दर्शन

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे सपत्नीक दर्शन घेतले. याप्रसंगी माजी खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर, माजी आमदार प्रशांत परिचारक, मुख्याधिकारी प्रशांत जाधव आदी उपस्थित होते.


## शक्तिपीठ महामार्ग सर्वेसाठी

# ३ कोटी ९६ लाख रुपये भरण्याचे आदेश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** नागपूर ते गोवा हा शक्तिपीठ महामार्ग सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, उत्तर सोलापूर, मोहोळ, पंढरपूर, सांगोला या पाच तालुक्यातून जाणार आहे. शक्तिपीठ महामार्ग करण्यासाठी मोजणी होणार आहे. याचा सर्वे करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने 3 कोटी 96 लाख रुपये शुल्क भरावे असे भूसंपादन विभागाने कळविले आहे.

नागपूर - गोवा हा द्रुतगती महामार्गाने शक्तिपीठ महामार्ग जोडला जाणार असून त्यासाठी पर्यटनाला मोठी संधी मिळणार आहे. मात्र कोणाचीही



मागणी नसताना हा महामार्ग केला जात असल्याने शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी या महामार्गात जातील त्यामुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांकडून मोठा विरोध सुरू आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर कोल्हापूर, सांगली, सोलापूर जिल्ह्यातून शक्तिपीठ महामार्गाला विरोध झाला होता. निवडणुकीचा फटका बसेल या भीतीने या प्रकल्पाला महायुती सरकारने स्थगिती दिली होती. मात्र राज्यात पुन्हा महायुतीची सत्ता येतात सरकारने हा प्रकल्प मार्गी लावण्यासाठी प्रशासनाला आदेश दिले आहेत. त्यामुळे शक्तिपीठ महामार्ग करण्यासाठी आता भूसंपादन करण्यात येणार आहे. याची मोजणी सर्वे करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने 3 कोटी 96 लाख रुपये भरावेत असे भूसंपादन विभागाने कळविले आहे.

शक्तिपीठ महामार्ग हा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा वतीने करण्यात येणार आहे. शक्तिपीठ महामार्गाचा सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, उत्तर सोलापूर, मोहोळ, पंढरपूर, सांगोला या पाच तालुक्यांना फायदा होणार आहे.

## तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**बार्शी :** अज्ञात कारणावरून एका तरुणाने शेतातील लिंबाच्या झाडास गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना दि. २२ जानेवारी रोजी सकाळी नऊ वाजेच्या पूर्वी खामगाव (ता. बार्शी) शिवारात घडली. अक्षय रवींद्र पाटील (वय ३१, रा. खामगाव) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत हर्षद हरिदास मुठाळ (वय २२, रा. खामगाव) यांनी पांगरी पोलिसांत दिलेल्या खबरमध्ये म्हटले आहे की, शेतात जात असताना दादासाहेब प्रभाकर पाटील यांच्या रस्त्यालगत असलेल्या शेतातील लिंबाच्या झाडाला त्याने दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे.

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे सपत्नीक दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.

तत्पुर्वी पालकमंत्री गोरे यांनी पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली सुरु असलेल्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिराचे जतन व संवर्धनाच्या कामांबाबतची माहिती घेतली.

याप्रसंगी आमदार समाधान आवताडे, माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर, माजी आमदार प्रशांत परिचारक, माजी आमदार राम सातपुते, प्रांताधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, तहसिलदार सचिन लंगुटे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशाधिन शेळकंदे, विशेष कार्यकारी अधिकारी महादेव घुले, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, मंदीर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

**माळशिरस :** पाणी भरून घरी येताना तोल जाऊन पडल्याने एका तरुणाचा मृत्यू झाला. एकनाथ विठ्ठल करडे (वय 27, रा. होनसळ, ता. उत्तर सोलापूर ) हा मंगळवारी रात्री पावणे दहा वाजण्याच्या सुमारास घराजवळ पाणी भरून घरी येत असताना तोल जाऊन डोक्यावर पडल्याने शासकीय रुग्णालयात नेण्यापूर्वीच वाटेत त्याचा मृत्यू झाला.

## शुभांगीताई मनमाडकर यांच्यावर पंढरपूकरांचा शुभेच्छांचा वर्षाव

# आदर्श समाज घडवण्यासाठी आईवडीलांचा वाढदिवस साजरा करणे महत्त्वाचे- नामजोशी

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** श्री क्षेत्र पंढरपूर नगरीतील आध्यात्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील आदरणीय व्यक्तिमत्व शुभांगीताई मनमाडकर यांच्या ६१ व्या अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्ताने कल्याणी नामजोशी व जयवंत महाराज बोधले यांनी सांगितले सुरुवातीला विठुरायाच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन ख्यातनाम संत साहित्य अभ्यासक डॉ कल्याणीताई नामजोशी.डॉ ह.भ.प. जयवंत महाराज बोधले. शुभांगी ताई मनमाडकर श.भगवानराव मनमाडकर. कृष्णामाई पटेल. निरंजन महाराज मनमाडकर .धनंजय मनमाडकर. पल्लवी मनमाडकर. आरती मनमाडकर. विद्या सांगळे श. ज्ञानेश्वर दुधाणे आदींच्या शुभहस्ते झाल्यानंतर अभिष्टचिंतन सोहळ्याला सुरुवात झाली. प्रास्ताविकात निरंजन महाराज मनमाडकर यांनी अभिष्टचिंतन सोहळा का करायचा आयोजनाची संकल्पना सांगितली.सुरुवातीला मान्यवरांच्या सत्कारानंतर शुभांगीताई मनमाडकर यांची साखर तुला आणि ६१ दिव्यांनी औक्षण झाल्यानंतर ६१ निमित्त सत्कार कल्याणीताई नामजोशी यांच्या शुभहस्ते आणि पंढरपूरकरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.त्यानंतर जयवंत महाराज बोधले यांच्या अभिर्वाचनाला सुरुवात झाली त्यांनी पंढरपूरमध्ये मनमाडकर परिवाराचं अध्यात्मिक आणि सांस्कृतिक सांगितिक क्षेत्रातील योगदानाचा महत्त्व विशद करताना सांगितले की दादा महाराज मनमाडकर गयामाता मनमाडकर यांचीही वारकरी परंपरा टिकवण्याचं काम मनमाडकर परिवार अतिशय यशस्वीरित्या सुरू ठेवलेल आहे याचा पंढरपूरकरांना अभिमान वाटतो. सत्कार हे दोन प्रकारचे असतो त्यामध्ये केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि केलेल्या कार्यापासून इतरांना प्रेरणा मिळावी या दोन्हींचा संगम शुभांगीताई यांच्यामध्ये असताना त्यांनी आयुष्यभर भजनामध्ये आणि



ध्यानामध्ये तल्लीन राहून इतरांना आध्यात्मिक सुखाचा आनंद देत आहेत त्यानंतर ताईंच्या सखी कृष्णामाई पटेल.माधूरीताई जोशी. चंदाताई तिवाडी.गौरी अमळनेरकर. रमेश घळसाशी यांनी आपल्या मनोगतामध्ये शुभांगी ताईंच्या आठवणी आणि कार्याचा गौरव सांगत वातावरण भुतकाळत घेऊन रंगत आणली.शुभांगीताईंनी आपल्या मनोगतातून सदैव शेवटच्या श्वासापर्यंत भजनाचा आणि ध्यानाचा आनंद सर्वांमध्ये निर्माण करायचा आहे.आणि आपलं प्रेम आशीर्वाद सदैव पाठीशी राहू द्यात सांगून अध्यक्षीय मनोगतात सौ कल्याणी ताई नामजोशी यांनी मनोगतातून पंढरपूरकर यांच्या विषयी आधीपासूनच खूप जिव्हाळ्याचे संबंध असताना आज शुभांगी ताई मनमाडकर यांच्या अभिष्टचिंतन निमित्त पंढरपूरला येऊन खूप आनंद वाटला आणि सत्कार हा कार्याचा होत असतो. आणि आपलं कार्य परंपरागत असल्याचे गौरवोद्गार सांगत वेदांतामधील त्यांचे अभ्यासपूर्ण मनोगत आणि त्यामधील मनुष्याच्या जीवनातील जगण्याचे टप्पे सांगताना उपस्थितांना ऐकतच रहावे असे वाटत होतं.त्यानंतर महाराष्ट्रातील ख्यातनाम गायिका ज्ञानेश्वरी गाडगे हिच्या सुमधुर भजनाचा सर्व रसिकांनी मनसोक्त आनंद घेत जय जय राम कृष्ण हरी.भाग्यदा लक्ष्मी बारंम्मा.केतकी गुलाब कानडा राजा पंढरीचा.माझे माहेर पंढरी रसिकांच्या आग्रहास्तव घेई छंद मकरंद आणि ठुमरी गात शेवटी लय नाही लय नाही मागणं सांगता केली त्यांना तितकीच सुंदर साथसंगत तबला श्रीहरी भगुरे.हार्मोनियम कार्तिकी गाडगे. पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे निवेदन गणेश गाडगे टाळ माऊली खरात यांनी केली.संपूर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राजेश खिस्ते यांनी सुंदर करत आभार ज्ञानेश्वर दुधाणे यांनी मानले.यावेळी पंढरपूर मधील सर्व नामांकित महाराज मंडळी सर्व क्षेत्रातील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.शेवटी सुरुची भोजनाची व्यवस्था ही सुंदर करत अविस्मरणीय क्षणाची अनुभूती सर्व पंढरपूरकरांनी घेतली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिवारावर प्रेम करण्याऱ्या सर्वांनी अधिक परिश्रम घेतले.

## बाहेरगावी देवदर्शन करणे पडले महागात




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** बाहेरगावी जाऊन देवदर्शन करणे एका सोलापुरातील कुटुंबाला चांगलेच महागात पडले आहे. त्याचे झाले असे की संतोष अंबादास येरला ( वय 33, रा. रविवार पेठ, सोलापूर ) हे 20 जानेवारीला कुटुंबासह देवदर्शनासाठी बाहेरगावी गेले होते. ही संधी साधून चोरट्याने बाथरूमच्या खिडकीचे गज कापून घरात प्रवेश केला व घरातील कपाटात ठेवलेले सोन्या चांदीचे दागिने तसेच रोकड असा 2 लाख 15 हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. येरला घरी परतल्यानंतर हा प्रकार लक्षात आला. चोरट्याविरुद्ध जेल रोड पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. या चोरीचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## Selected

## सून अन् तिच्या प्रियकराची सासऱ्यास जबर मारहाण




**बार्शी :** बार्शी तालुक्यातील एका गावामध्ये अनैतिक संबंधाला विरोध केला म्हणून सून व तिच्या प्रियकराने कोयता व लोखंडी पाइपने सासऱ्यास गंभीर जखमी केल्याची घटना घडली आहे. वैराग पोलिसांत सासऱ्याने याबाबतची फिर्याद दिल्याने दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे. त्यावेळी तेथे सून व तिचा प्रियकर यांच्या अनैतिक संबंधाला विरोध का केला म्हणून फिर्यादी सासऱ्यास सुनेसह तिच्या प्रियकराने कोयता व लोखंडी पाइपने गंभीर जखमी केले.

## जनावरांना केले लसीकरण



**करमाळा :** उंदरगाव येथे विद्या विकास मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाच्या श्रमसंस्कार शिबिर सुरु आहे. यामध्ये शेळ्या, मेंढ्या व जनावरांना लसीकरण करण्यात आले. करमाळा पंचायत समितीचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. मनीष यादव यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. झोळ, डॉ. गणेश बाबर, डॉ. राहुल जवळ, डॉ. दत्तात्रेय वाघमारे, सरपंच युवराज मगर, उपसरंपच शिवाजी कोकरे व इतर गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोलापूर जिल्हा समन्वयक प्रा. लक्ष्मण राख, प्रा. सुजाता भोरे उपस्थित होते.

## 1 कोटी 80 लाखांचा निधी आमदारांना मिळणार



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर जिल्हा नियोजन समितीने जिल्ह्यातील आमदारांना पत्र पाठवून कामे सुचविण्याची विनंती केली आहे. जिल्ह्यातील प्रत्येक आमदाराला मार्चअखेर 1 कोटी 80 लाख इतका निधी शासनाकडून मिळणार आहे. इतक्याच निधीची कामे जिल्हा नियोजन समितीकडे सुचविण्याचे आदेश राज्य शासनाने आमदारांना दिले आहेत. आमदारांना दरवर्षी 5 कोटींचा निधी मिळतो. चालू वर्षात डिसेंबर ते मार्च असे एकुण चार महिने मिळाले असून या 4 महिन्यात विकास निधी म्हणून आमदारांना केवळ 1 कोटी 80 लाख रुपये मिळणार आहे

## सर्वांगीण विकासावर अधिक भर देणार - आ. देशमुख



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर दक्षिण विधानसभा मतदार संघाचे आमदार सुभाष देशमुख यांनी पाकणी येथे सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी नागरिकांशी संवाद साधत गेल्या दहा वर्षात मतदारसंघात केलेल्या कामांची माहिती दिली. शिवाय आगामी काळात दक्षिण सोलापूर मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्यावर अधिक भर असेल अशी भूमिका मांडली. याप्रसंगी तालुकाध्यक्ष राम जाधव, सुनील गुंड, संजय वाघमोडे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## भेट...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**सांगोला :** सांगोल्याचे आमदार डॉ बाबासाहेब देशमुख यांनी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची भेट घेतली आहे. सोलापूर जिल्ह्यातील आरोग्याच्या समस्या मार्गी लावण्याची मागणी ही केली आहे. मतदारसंघात आरोग्याच्या विविध समस्या आहेत त्या मार्गी लावण्याचे आश्वासनही आरोग्य मंत्री यांनी आमदार देशमुख यांना दिले आहे.

## अंगणवाडी सेविकांचे प्रश्न मार्गी लावणार



**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांचे प्रश्न मार्गी लावणार असे प्रतिपादन आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी केले आहे. अंगणवाडी सेविकांसाठी पंचायत समिती ते विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते त्यावेळी ते उपस्थित होते. अंगणवाडी सेवकांचे प्रश्न शासन दरबारी मांडून ते चांगल्या पद्धतीने मार्गी लावण्याचा प्रयत्न असेल असे प्रतिपादन देशमुख यांनी केले आहे.

## सोलापुरात निघाली हेल्मेट रॅली



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार व प्रमुख अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा जिल्हा न्यायाधीश सलमान आझमी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, प्रादेशिक परिवहन कार्यालय, शहर पोलीस वाहतूक शाखा व वकील संघ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात शिरस्त्रान फेरी (हेल्मेट रॅली) संपन्न झाली. रस्ता सुरक्षा सप्ताह निमित्ताने सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तर्फे ही रॅली काढण्यात आली. या हेल्मेट रॅलीचा शुभारंभ जिल्हा न्यायाधीश सलमान आझमी यांच्या हस्ते झेंडा दाखवून झाला.

## पंढरीत संत जळोजी मळोजी महाराज पुण्यतिथी सोहळा संपन्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी संत जळोजी मळोजी महाराज मठ पंढरपूर येथे जळोजी मळोजी पुण्यतिथी सोहळा पौषशुद्ध नवमी ते पौष वद्य षष्ठी या कालावधीत ज्ञानेश्वरी पारायण गाथा भजन प्रवचन व कीर्तन तसेच हरिजागर आणि काकडा अशा अनेक उपक्रमाने बारा दिवस हा सप्ताह चालू होता सप्ताहाची सुरुवात हरिभक्त परायण गुरुवर्य राणोजी महाराज दादासाहेब वासकर यांच्या उपस्थितीत मंचरी ग्रंथाचे पूजन, ज्ञानेश्वरी ग्रंथपुजन व पारायण आणि तुकाराम गाथा भजन तसेच संत बंधू जळोजी मळोजी यांच्या ग्रंथाचे वाचन व विश्लेषण करण्यात आले सदर सप्ताहामध्ये ह भ प नामदेव



महाराज वासकर गडावरील, ह भ प जाधव महाराज गुरुजी, ह भ प राजेंद्र रोंगे महाराज, ह भ प भीमराव महाराज झरेकर, ह भ प सचिन महाराज धर्म हाधिकारी, ह भ प गुरुजी बुवा, ह भ प लक्ष्मण काळे महाराज ,ह भ प धोंडोपंत दादा फड, ह भ प नामदेव महाराज फड ,ह भ प गंगू काका शिरवळकर फड, व शेवटच्या दिवशी काल्याचे किर्तन हरिभक्त परायण हरिभाऊ महाराज किसन इंगळे यांचे झाले पुण्यतिथीचा मुख्य दिवस पौंष वैद्य पंचमी या दिवशी संत बंधूची पालखी प्रदक्षिणा मार्गे निघून चंद्रभागा वाळवंटातील समाधीवर दुपारी बारा वाजता अभिषेक व पुष्पांचा वर्षाव करण्यात आला. ती दिंडी प्रदक्षणा मार्गे विठ्ठल मंदिरापासून मंदिरातील संत बंधुच्या समाधीची पूजा व अभिषेक करून संत पेठ मधील जळोजी मुळोजीयांच्या मठात आली तेथे काही महिला व पुरुषानी फुगडी खेळून आनंद उत्सव साजरा केला त्यानंतर सर्व भक्तांना महाप्रसाद देण्यात आला सदर सप्ताह मध्ये अनेक अन्नदात्यांनी आपापल्या नियोजित दिलेल्या वेळेप्रमाणे सकाळचे फराळ दुपारचे जेवण व रात्रीचे जेवण याप्रमाणे अन्नदान करण्यात आले शेवटी रविवार दिनांक 19 11 2025 रोजी प्रदक्षणा मार्गे दिंडी निघून हरिभक्त पारायण हरिभाऊ इंगळे महाराज यांचे काल्याचे किर्तन झाले व काल्याचा प्रसाद घेऊन सर्व मंडळी आनंद व उत्साह घेऊन आपापल्या गावी मार्गस्थ झाले सदर सप्ताह मध्ये संत जळोजी मळोजी उत्सव कमिटी व समस्त विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज बांधव यांच्या सहकार्याने हा सप्ताह उत्सव व्यवस्थित पार पडला.

## काचेचा बॉक्स अंगावर पडून कामगाराचा मृत्यू




**बार्शी :** बार्शी शहरातील गाडेगाव रस्त्यावर नागोबाची वाडी हद्दीतील मांजरे हॉस्पिटलचे काम सुरू असून, वाहनातून वजनदार काच उतरवत असताना काच छातीवर पडून कामगाराचा मृत्यू झाला. बार्शी तालुका पोलिस ठाण्यात या घटनेची नोंद झाली आहे. आनंद दयानंद अडगळे (वय ३९, रा. त्रिमूर्ती कॉलनी) असे या घटनेत मृत्यू झालेल्या कामगाराचे नाव आहे. बार्शी शहर पोलिस ठाण्यास जगदाळे मामा रुग्णालयाने कामगार अडगळे जखमी झाल्याची माहिती कळविली होती. त्यानंतर त्यांच्यावर उपचार सुरू असताना रात्री साडेनऊच्या दरम्यान मृत्यू झाला.




## फटाक्यांच्या आतिषबाजीने, फुलांच्या उधळणीने

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे माळशिरस नगरीमध्ये जंगी स्वागत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास व पंचायत राजमंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा गुरुवार दि. २३ जानेवारी २०२५ रोजी सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यात दौरा होता. सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री पहिल्यांदाच माळशिरस तालुक्यात आले. भारतीय जनता युवा मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व माळशिरस विधानसभेचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे माळशिरस तालुक्यात पहिले पाऊल माळशिरस नगरीत पडले.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या महायुतीच्या सरकारने सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री पदाची जबाबदारी ग्रामविकास व पंचायत राजमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे दिल्यानंतर ते पहिल्यांदाच माळशिरस तालुक्याच्या दौऱ्यावर आले. शिखर शिंगणापूर येथून शंभू महादेवाचा आशीर्वाद घेऊन माळशिरस तालुक्यात आगमन केले. त्यानंतर भारतीय जनता युवा मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व माळशिरस विधानसभेचे लोकप्रिय दमदार माजी आमदार राम सातपुते यांच्या मांडवे येथील श्रीराम बंगला या निवासस्थानी सदिच्छा भेट देऊन माळशिरस मध्ये अहिल्यादेवी चौक या ठिकाणी माळशिरस नगर पंचायतचे माजी नगराध्यक्ष डॉक्टर आप्पासाहेब देशमुख व विद्यमान नगराध्यक्ष विजयकुमार देशमुख यांनी पुण्याहून ५० हजार रुपये किमतीचा मोठा हार, दोन मोठे जेसीबी त्यातून फुलांची मनसोक्त उधळण, तसेच फटाक्यांची आतषबाजी, मोठमोठे डॉल्बी अशाप्रकारे पालकमंत्री जयकुमार गोरे तसेच त्यांच्याबरोबर माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर ,माजी आमदार राम सातपुते यांचे जंगी स्वागत केले डॉक्टर आप्पासाहेब देशमुख माळशिरस नगरपंचायतचे माजी नगराध्यक्ष व विद्यमान नगराध्यक्ष विजयकुमार देशमुख यांनी



तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतःला झोकून देऊन माळशिरस तालुक्याचा कायापालट करून चेहरा मोहरा बदलून टाकण्याचा मानस केला आहे. लवकरच माळशिरस शहरांमध्ये दीडशे कोटी रुपये खर्चून पाणीपुरवठा योजना शुभारंभ होणार आहे.

त्यावेळी माळशिरस तालुक्यातील भाजपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सोलापूर :** सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंती निमित्त आज जेलरोड पोलीस स्टेशन जवळील सुभाष उद्यान येथील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास काँग्रेस अध्यक्ष चेतन नरोटे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक विनोद भोसले, महिला अध्यक्ष प्रमिला तूपलवंडे, सेवादल अध्यक्ष भीमाशंकर टेकाळे, मिडिया सेल अध्यक्ष तिरुपती परकीपडंला, माजी महिला अध्यक्ष सुमन जाधव, हेमा चिचोंळकर, नागेश म्हेत्रे, गिरीधर थोरात, लखन गायकवाड, परशुराम सतरवाले आदी उपस्थित होते.

## स्वेरीत सातवा 'मासिक योग दिन' साजरा

# व्यायामात सातत्य आवश्यक - योग प्रशिक्षिका सुप्रिया शेंबडे

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क


**पंढरपूर :** 'सध्या केवळ योग दिन किंवा प्रशिक्षण सुरू असताना, आजार झाल्यानंतर व कार्यशाळा असेपर्यंत व्यायाम केला जातो. परंतु सध्याच्या धकाधकीच्या जीवनात मनाच्या शांतीसाठी नियमित व्यायाम करण्याची आवश्यकता आहे. व्यायाम केल्यामुळे आपले आरोग्य आणि मन प्रसन्न राहते. करत असलेल्या कार्यात सकारात्मकता निर्माण होते, उत्साह वाढतो. म्हणून योगा, प्राणायम, व्यायाम करण्यात सातत्य हवे. यामुळे आपल्यातील उत्साह टिकून राहतो.' असे प्रतिपादन स्वेरीच्या योग प्रशिक्षिका सुप्रिया शेंबडे यांनी केले.



**पंढरपूर :** स्वेरीमध्ये 'सातव्या योग दिन' निमित्त विद्यार्थी व प्राध्यापकांना मार्गदर्शन करताना स्वेरीच्या योग प्रशिक्षिका सुप्रिया शेंबडे सोबत प्राणायम करताना प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व विद्यार्थिनी.

प्रत्येक वर्षी दि.२१ जून रोजी 'जागतिक योग दिन' हा आंतरराष्ट्रीय स्तरावर अर्थात जगभरात साजरा केला जातो. दि.२१ जून रोजी स्वेरीत मुख्य 'जागतिक योग दिन' साजरा करण्यात आला. यावेळी स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी यापुढेही 'स्वेरी अंतर्गत असलेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक महिन्याच्या दि.२१ तारखेला सामुहिक 'योग दिन' साजरा करण्याचे घोषित केले होते. तेंव्हापासून प्रत्येक महिन्याच्या दि. २१ तारखेला न चुकता स्वेरीत 'योग दिन' घेतला जातो. मंगळवार, दि. २१ जानेवारी २०२५ हा स्वेरीमध्ये 'सातवा योग दिन' साजरा करण्यात आला. अभियांत्रिकीच्या दुसऱ्या, तिसऱ्या व अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांची परीक्षा सुरु आहे. परंतु स्वेरी च्या 'योगा डे' मध्ये खंड न पडता डिप्लोमाच्या व वसतीगृहातील सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमासाठी प्रचंड प्रतिसाद दिला. विठ्ठलाचे अभंग आणि गणेश वंदनेने या 'योगा डे'ची सुरवात झाली. पुढे स्वेरीच्या योग प्रशिक्षिका सुप्रिया शेंबडे यांनी विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक यांच्याकडून पुढे तासभर विविध प्राणायम करवून घेतले. विविध आसने, भस्रीका प्राणायम तसेच श्वास, फुफुस्से, सांधे, पोटाचे, अवयवांचे विविध प्रकार करून घेतले. या योग सरावानंतर सर्वांच्या चेहऱ्यावर अधिक उत्साह दिसून येत होता. मार्गदर्शन करताना प्रशिक्षिका सुप्रिया शेंबडे पुढे म्हणाल्या की, 'नियमित व्यायाम आणि योग्य आहार घेतल्यास मनात सकारात्मक विचार येवून मन प्रसन्न राहते. म्हणून प्राणायम, योगा नियमित करण्याची गरज आहे. यामुळे मनाची एकाग्रता वाढते.' असे सांगून 'योगा' चे होणारे फायदे सांगितले. वसतिगृहातील विद्यार्थिनी मयुरी चौगुले म्हणाल्या की, 'पूर्वी मी उशिरा उठायचे, स्वेरीत आल्यावर प्राणायम करण्याचे मनावर घेतले. आता मी नियमित लवकर उठते. करत असलेल्या प्राणायमामुळे मनात सकारात्मकता येते. आपले ध्येय साध्य करण्यासाठी प्राणायम करणे गरजेचे आहे याची खात्री पटते.' असे सांगून स्वेरीने उपलब्ध करून दिलेल्या या व्यासपीठाचे आभार मानले. सदरचा कार्यक्रम स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार यांच्या सहकार्याने, इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.महेश मठपती, वसतिगृह व्यवस्थापक डॉ. के.बी. पाटील, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख,प्राध्यापक वर्ग, इंजिनिअरींग व फार्मसीच्या विद्यार्थिनी यांच्या उपस्थितीत पार पडला. प्रा. रजनी पटेल यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

## कट मारल्याचा जाब विचारल्याने चाकूने वार




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** दुचाकीला कट मारल्याचा जाब विचारल्याच्या कारणावरून चिडून चौघांनी मिळून शिवीगाळ, दमदाटी व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून चाकूने डोक्यात मारून तरुणाला गंभीर जखमी केले. याबाबत, जखमी सचिन सुभाष हिप्परकर यांनी फिर्याद दिली. याप्रकरणी लक्ष्मण बाळू शिंदे, कुंडलिक बाळू शिंदेसांगोला तालुक्यातील लक्ष्मीनगर येथील घटना आहे. तरुणाला गंभीर जखमी केल्याप्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल केले आहे. (दोघेही रा. लक्ष्मीनगर), कुणाल विजय कांबळे, दत्ता संजय माने (दोघेही रा. महूद ता. सांगोला) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

» पान १ वरुन

## कॉरिडॉर आराखडा तयार करण्याचे....

सोलापूर जिल्ह्यात कोणत्याही माफियाचे राज्य चालू देणार नाही. अधिकारी व जनतेला त्रास होणार नाही याची ग्वाही देतो. कोण जर त्रास देत असेल तर त्यांचा योग्य बंदोबस्त करण्यात येईल असेही गोरे यांनी सांगितले. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूर जिल्हा दौरा केल्यामुळे भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने शिर्डी येथे नुकताच राज्यस्तरीय मेळावा घेतला होता. यामुळे पदाधिकारी व कार्यकर्ते यांना ऊर्जा मिळाली होती. आता पालकमंत्री यांनी सोलापूर जिल्ह्याकडे लक्ष केंद्रित केले असल्यामुळे पदाधिकारी व कार्यकर्ते आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी कामाला लागले असल्याचे दिसून येत आहे.

» Selected


## खोट्या पावत्या देऊन फसवणूक




**मोहोळ :** शेतात नवीन डीपी बसविण्याच्या बहाण्याने मंगेश लक्ष्मण जाधव (रा. किणी, ता. अक्कलकोट) याने मोहोळ तालुक्यातील सात शेतकऱ्यांना खोट्या पावत्या देऊन जवळपास एक लाख १२ हजार रुपये घेतले. पण, त्याने डीपी बसवून देण्यास टाळाटाळ केल्याने शेतकरी मोहोळच्या महावितरण कार्यालयात गेले. त्यावेळी मंगेश जाधव याने दिलेल्या पावत्या खोट्या असल्याचे समोर आले. त्यानंतर लहू भगवान खडूस (रा. वाफळे, ता. मोहोळ) यांनी मोहोळ पोलिसांत फिर्याद दिली.

## रोख रक्कम घेऊन विवाहिता झाली बेपत्ता

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**मोहोळ :** एका कुटुंबातील महिला सात महिन्याच्या लहान मुलाला सोडून बेपत्ता झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. सदर महिलेने तिच्या सोबत घरातील सोन्याचे दागदागीने व रोख रक्कमही घेऊन गेली आहे.महिला अचानक बेपत्ता झाल्याने कुटूंबीय चिंतेत पडले असून नातेवाईकांनी मोहोळ पोलिसात तक्रार दाखल केली आहे. ही घटना चिखली ता मोहोळ येथे घडली.

मोहोळ पोलिसा कडून मिळालेली माहिती अशी की, आकाश तानाजी गुंड हे गेल्या अनेक वर्षा पासून चिखली येथे आई, पत्नी सह वास्तव्यास आहेत. त्यांचे गेल्या दोन वर्षापूर्वी कर्नाटक राज्यातील धर्मपल्ली येथील अक्षदा नावाच्या मुलीशी विवाह झाला आहे. या दांपत्याना सात महिन्याचा लहान मुलगा आहे.ता. 16 जानेवारी रोजी आकाश आणि त्याची आई रोजंदारीवर कामाच्या निमित्ताने बाहेर गावी गेले होते. कामावरून घरी आल्यानंतर त्यांना अक्षदा घरी दिसली नाही. त्यांनी इकडे तिकडे शोधाशोध केली, त्यावेळी त्यांना त्यांच्या शेजारील नातेवाईकांच्या घरी मुलाला सोडून जनावरांना पाणी वैरण करून येते असे सांगून गेली असल्याचे समजले.यावरून त्यांनी थोडावेळ वाट पाहीली मात्र ती घरी परतली नसल्याने घरात ठेवलेले सोने आणि पैसे आहेत का हे पाहीले असता, घरातील सोने व रोख रक्कम गायब असल्याचे त्यांच्या दर्शनास आले. कोणालाही काहीही न सांगता अक्षदा घरातुन निघून गेल्याची खात्री झाली.दरम्यान सात महिन्याच्या छोट्या बाळाला सोडून निघून गेल्याने या घटनेचे गुढ वाढले आहे. ही घटना घडल्या नंतर दिवस रात्र गुंड कुटुंबीयांनी शोधाशोध केली. मात्र, अक्षदाचा कोठे ही थांगपत्ता लागत नसल्याने ता 17 रोजी महिला घरातून गायब झाल्याची तक्रार आकाश गुंड यानी मोहोळ पोलीसात दिली.

पोलिसांनी महिलेचा शोध सुरू केला असून, सदर महिलेची कोणाला माहिती मिळाल्यास अथवा कोणाच्या निदर्शनास आल्यास त्यांनी मोहोळ पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

## चांदीच्या पादुका भेट

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीस पुणे येथील ऋषिकेश सचिन पवार यांनी ११५ ग्रॅम वजनाच्या चांदीच्या पादुका विठ्ठल रुक्मिणी चरणी अर्पण केल्या. त्याबद्दल त्यांचा सत्कार मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प. श्री ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर यांनी मंदिर समितीची दैनंदिनी व दिनदर्शिका देऊन केला.

## सराईत चोरांकडून आठ दुचाकी जप्त



**अक्कलकोट :** सराईत गुन्हेगारांनी चोरलेल्या आठ दुचाकी अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्याने चोरट्यांकडून जप्त केल्या. प्रथमच इतक्या मोठ्या स्वरूपात दुचाकी जप्त करण्याची दमदार कामगिरी केली. यात समर्थ भगबान कामाठी (२५, रा. हसापूर, ता. अक्कलकोट) तसेच सिद्धाराम शिवशंकर ज्योते (२६) लक्ष्मण हाजीमलंग माने (३२, दोघे रा. गौडगाव ता. अक्कलकोट) या दोन आरोपींनाही अटक करून त्यांच्या ताब्यातून एकूण आठ दुचाकी जप्त केल्या.

## आवर्तन १० फेब्रुवारीला बंद होणार



**सोलापूर- :** रब्बी हंगामातील पिकासाठी ४ जानेवारीपासून उजनी धरणातून सोडण्यात आलेले पहिले आवर्तन येत्या १० फेब्रुवारीला बंद केले जाणार आहे. त्याशिवाय सध्या बोगद्याचा विसर्गही कमी करण्यात आला आहे. दरम्यान, सध्या धरणात ४३. ५० टीएमसी इतके पाणी आहे. आगामी उन्हाळी हंगामाचा विचार करता ते पुरेसे आहे, त्यामुळे आणखी एखादे आवर्तन त्यातून मिळू शकते, असे सांगण्यात आले.

## उमा महाविद्यालयात मराठी भाषा विभागांतर्गत 'आजचा तरुण आणि वाचन संस्कृती' या विषयावर व्याख्यान

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** महाविद्यालय पंढरपूर मधील मराठी विभागांतर्गत 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्त आजचा तरुण आणि वाचन संस्कृती' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ.रमेश शिंदे होते. या कार्यक्रमाप्रसंगी बोलताना " विद्यार्थ्यांनी क्रमिक अभ्यासक्रमातील पुस्तके वाचन करीत असताना आपल्या मनाला भावणाऱ्या व अनुभव समृद्ध करणाऱ्या इतरही मराठी साहित्याचे वाचन करावे. वाचनाने व्यक्तीच्या संवेदना जागृत होतात.



व्यक्तीमध्ये वैचारिकताही निर्माण होते. एकच पुस्तक वाचतानाचा अनुभव वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर वेगळ्या पद्धतीने येतो. साहित्यात जी संस्कार मूल्ये असतात ती वाचकाच्या मनामध्ये रुजतात त्यामुळे व्यक्तिमत्व विकास होतो. म्हणूनच ग्रंथ हेच गुरु मानत असताना त्यांचे वाचनही महत्त्वाचे आहे. असे प्रतिपादन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.धीरजकुमार बाड अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना 'राष्ट्राची प्रगती भाषा आणि संस्कृती यावर अवलंबून असते. या संस्कृतीचे जतन भाषेच्या माध्यमातून साहित्यात केले जाते. इतर भाषा अवगत असल्या तरी मराठी भाषे बद्दल अभिमान असावा. आपल्या मराठी भाषेचा अभिमान बाळगत असताना मराठी साहित्याचे वाचन करणे व मराठी बोलणे आवश्यक आहे; त्यामुळे भाषा जिवंत व प्रवाही राहते असे विशद केले. या कार्यक्रमासाठी आय क्यु ए सी कॉर्डिनेटर प्रा. अविनाश देशपांडे,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. लोखंडे एन एस, प्रा. कुलकर्णी ए.व्ही, प्रा.चौगुले ए यू , प्रा. गाडे आर डी, प्रा.बनसोडे ए डी, प्रा.रणदिवे डी एस उपस्थित होते. या र्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक, पाहुण्यांचा परिचय मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सर्वगोड एन.सी. यांनी केले. सूत्रसंचालन प्राध्यापक डॉक्टर दत्ता सरगर यांनी केले. उपस्थितांचे आभार प्राध्यापक वर्षा सरतापे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रांताधिकाऱ्यांवर वाळू माफीयांकडून हल्ला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माढा :** माढ्याच्या प्रांताधिकाऱ्यांवर वाळू माफीयांकडून हल्ला, वाळू माफियांकडून प्रांत अधिकाऱ्यांची गाडी अडवून शिवीगाळ व धक्काबुक्की केली. महिला प्रांताधिकाऱ्यांना वाळू माफीयांनी मध्यरात्री अडवले, माढा तालुक्यातील टेंभुर्णी जवळ घडली सिनेस्टाईल घटना घडली. वाळूवर कारवाई केली म्हणून ्रांताधिकाऱ्यांची गाडी अडवून झाली शिवीगाळ, टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल , प्रियांका आंबेकर -ठोकळ आहेत माढ्याच्या प्रांताधिकारी यांच्यावर हल्ला केला.




## आमदार उत्तमराव जानकर साहेब यांच्या शुभहस्ते सागर उरवणे यांचा सत्कार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** विमा क्षेत्रातील अत्यंत मानाचा समजला जाणारा आंतरराष्ट्रीय LIC MDRT पुरस्कार सलग तीन वेळा मिळवल्याबद्दल व सदाशिवनगर आणि पुरंदावडे गावाला LIC चा बीमा ग्राम पुरस्कार मिळवून दिल्याबद्दल माळशिरस तालुक्याचे विद्यमान आमदार माननीय श्री उत्तमराव जानकर साहेब यांनी सागर उरवणे यांचा सत्कार केला व पुढील कार्यास शु भेच्छा दिल्या .....सागर उरवणे यांचे गेल्या 20 वर्षातील विमा क्षेत्रातले काम हे उल्लेखनीय आणि कौतुकास्पद असून त्यांनी सदाशिवनगर व पंचक्रोशीत विम्याचा प्रसार आणि प्रचार मोठ्या स्वरूपात केलेला आहे असे गौरव उद्गार आमदार उत्तमराव जानकर यांनी काढले.

**महाराष्ट्र शासन - जलसंपदा विभाग**
**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे**
**कार्यकारी अभियंता, उजनी जलविद्युत विभाग, इंदापुर, जि.पुणे**
**दूरध्वनी क्र. ०२१११-२९५७९४**
**ई-मेल पत्ता :- ujjanihydroidapur@yahoo.in**

**निविदा सुचना क्र. ब-१/१२/ २०२४-२५**

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग उर्जा व कामगार विभाग कडील परवानाधारक विद्युत पंजीकृत कंत्राटदारांकडून महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळा करिता ब-१ निविदा मागविण्यात येत आहेत. खालील कामांसाठी कोरे निविदा संचाची प्रत कार्यकारी अभियंता, उजनी जलविद्युत विभाग, इंदापूर, जि. पुणे (दूरध्वनी क्र. ०२१११-२९५७९४) यांच्या कार्यालयातून दिनांक २७/०१/२०२५ ते ०३/०२/२०२५ या कालावधीमध्ये कार्यालयीन वेळेत मिळू शकेल. वर दर्शविलेल्या कार्यालयात दिनांक ०५/०२/२०२५ रोजी दु. १७.०० वाजेपर्यंत सिलबंद निविदा स्विकारल्या जातील व शक्य असल्यास त्याच दिवशी उघडण्यात येतील. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत (रुपये) | इसारा रक्कम (रुपये) | कोऱ्या निविदा संचाची किंमत रुपये जी.एस.टी.सह (ना परतावा) | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | उजनी धरण माथ्यावरील व गॅरली मधील पॉवर केबलसाठी केबल टे बसविणे व नादुरुस्त केबल काढणे तसेच एफ.आर.फी. बॉक्स बदलणे. | रु.8,45,693/- | 9000/- | 1180/- | 6 महिने |
| २. | व्ही.आय.पी.विश्रामगृह, भीमानगर येथे इलेक्ट्रीकल फिटिंग व अनुषंगिक कामे | रु.8,47,444/- | 9000/- | 1180/- | 6 महिने |

सुचना - १. इसारा रक्कम डिमांड ड्राफ्ट अथवा मुदत ठेव पावती स्वरुपात कार्यकारी अभियंता यांचे नावे काढलेल्या राष्ट्रीयकृत बँकेची अथवा शेड्युल बँकेची असावी.
२.निविदा पत्रासोबत नोंदणी प्रमाणपत्र, आयकर दाखला जोडणे बंधनकारक आहे.
३. https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
४. निविदा सादर करण्यासाठी निविदाकार यांनी केलेल्या आर्थिक खर्चास जबाबदार न राहता कोणतीही एक किंवा सर्व निविदा फेटाळ्याचे किंवा संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत.


जा.क्र.काउ/उजविवि/निविदा/१०१/सन २०२५
उजनी जलविद्युत विभाग, इंदापूर
दिनांक - १७/०१/२०२५
**जिमाका/सो/जाहि/२७५/२०२४-२५**

सही/-
( कि.मा. चौकडे )
कार्यकारी अभियंता
उजनी जलविद्युत विभाग, इंदापूर

संपादकीय विशेष

# ‘भारतपोल’च्या निमित्ताने...

सीबीआयने ‘भारतपोल’ हे संकेतस्थळ बनवले आहे. यासंदर्भात पोलीस स्थानकातील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारीही सीबीआयवर सोपवण्यात आली आहे. भारतातल्या कायदे राबवणाऱ्या सर्व यंत्रणांसाठी ‘भारतपोल’ हे तांत्रिक संकेतस्थळ ठरणार असून त्यामध्ये पाच वेगवेगळी मोड्युल्स ठेवली आहेत. कनेक्ट, इंटरपोल नोटीस, रेफरन्स, ब्रॉडकास्ट आणि रिसोर्सेस असे त्याचे स्वरुप असून यातील संपर्काच्या माध्यमातून इंटरपोलचे भारतातील काम पाहणाऱ्या नॅशनल सेंटर ब्युरोचा भाग असल्यासारखेच स्थानिक पोलिसांना काम करता येईल. त्यामुळे इंटरपोलकडे तात्काळ सूचना पाठवता येतील आणि कोणत्याही देशात आश्रय घेतला असला तरी भारतातून पळून गेलेल्या गुन्हेगारांवर कारवाई करणे शक्य होईल. या संकेतस्थळामुळे विविध देशांमधे गुन्हे करणारे गुन्हेगार, भ्रष्टाचार करणाऱ्या व्यक्ती तसेच गुन्ह्यातून त्यांनी जमवलेली संपत्ती याविरुद्धदेखील कारवाई करणे शक्य होणार आहे. पूर्वी भाराबाहेरील गुन्हेगारांवर कारवाई करायची असल्यास स्थानिक पोलिसांना सीबीआयच्या माध्यमातून जावे लागत असे. पण यामुळे गुन्हेगार पकडण्यात मौल्यवान ठरणारा बराच वेळ वाया जात असे.




आता ‘भारतपोल’मुळे सायबर भामटे, अमली पदार्थांचा गैरव्यापार करणारे, माणसांची तस्करी करणारे गुन्हेगार अशा सर्वांविरुद्ध बडगा उभारण्यासाठी वेळेत आंतरराष्ट्रीय सहकार्य मिळू शकेल. तसेच स्थानिक पोलीस अधिकारीही अशा गुन्हेगारांविरुद्ध रेड कॉर्नर नोटीस आणि इंटरपोल नोटीस सहज पाठवू शकतील. रेड कॉर्नर नोटीस मिळाल्यानंतर इंटरपोल सर्व सदस्य देशांना गायब झालेल्या आणि पाहिजे असलेल्या व्यक्तीबद्दल कळवते. त्याप्रमाणे सदस्य देशांनी अशा व्यक्तीना पकडणे बंधनकारक नसले तरी या सूचनेप्रमाणे अशा व्यक्तीना बंधनात ठेऊन भारतात प्रत्यार्पण करण्याची प्रक्रिया सुरू केली जाते. या नोटिसमुळे केवळ संबंधित व्यक्तीलाच पकडता येते असे नव्हे, तर त्याची बँक खातीही गोठवली जातात. अर्थात अशी विनंती इंटरपोल नाकारू शकते.

आता सर्व पोलीस अधिकाऱ्यांनी ‘भारतपोल’ या नवीन प्रणालीचा अभ्यास करून जास्तीत जास्त फायदा उठवणे ही काळाची गरज आहे. याचे कारण म्हणजे आजही अनेक आर्थिक गुन्हेगार, दहशतवादी, मानवतस्करी करणारे लोक भारतातील कायद्यामधील उणीवा शोधून, गैरफायदा घेऊन परदेशामधे पळून जातात आणि स्वतःला भारतीय न्याय प्रणालीपासून वाचवतात. राजकीय वरदहस्त असल्याने अनेक राष्ट्रीयकृत बँकांकडून हजारो कोटींचे कर्ज घेऊन विजय मल्ल्या इंग्लंडला पळून गेला. त्याने 17 भारतीय बँकांना फसवून नऊ हजार कोटींपेक्षा अधिक रक्कम बुडवली आहे. त्याचप्रमाणे नीरव मोदी या हिरेव्यापाऱ्याने पंजाब नॅशनल बँकेकडून 11 हजार कोटींपेक्षा अधिक रक्कम कर्जाने घेतली आणि भारताबाहेर पळून गेला. टॉरेस ज्वेलर्ससारख्या संस्था पॉन्झी योजनांमध्ये (आर्थिक फसवणुकीच्या हेतून तयार केलेल्या) मध्यमवर्गीयांकडून आकर्षक योजनांखाली कोट्यवधी रुपये घ्यायचे आणि अचानक देश सोडून पळून जायचे, असा लुबाडणुकीचा धंदा करत आहेत. अशा प्रकारे बुडालेली रक्कम काही लाख कोटी असावी, असा अंदाज सीबीआयने व्यक्त केला होता.

मानवी तस्करी हीदेखील आंतरराष्ट्रीय स्तरावर चालणारी अत्यंत गुंतागुंतीची बाब आहे. मानवी तस्करीमध्ये प्रामुख्याने महिला आणि मुले बळी पडत असले तरी पुरूषांची मानवी तस्करीही मोठ्या प्रमाणावर होत असते. दर वर्षी सहा ते आठ लाख व्यक्तींची मानवी तस्करी होत असून हा आकडा दर वर्षी वाढत आहे. मानवी तस्करीमध्ये अडकणाऱ्या व्यक्तींना देहविक्रय, खाणकामगार, शेतमजूर, घरगुती कामगार आणि इतर अनेक प्रकारच्या इच्छा नसलेल्या गुलामगिरीत दिवस काढावे लागतात. सदर व्यक्तींना बळजबरीने शोषण करण्यासाठी वापरले जाते. मोठ्या प्रमाणातील बेरोजगारी आणि सरकारी अधिकाऱ्यांची निष्क्रियता या गोष्टी याला मोठ्या प्रमाणावर जबाबदार आहेत. अर्थातच यामध्ये गरिबी हेदेखील एक मोठे कारण आहे. मानवी तस्करीमधे संघटित आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी दिसून येते. त्यातून होणाऱ्या नफ्यामुळे संघटित गुन्हेगारी, अमली पदार्थांचा व्यापार आणि शस्त्रास्त्रांचा व्यापार मोठ्या प्रमाणात केला जातो. स्वाभाविकच यामुळे सर्वच देशांसाठी सुरक्षेचा फार मोठा धोका उद्भवतो. मानवी तस्करीतील व्यक्तींना अन्यायाविरुद्ध लढण्याची कोणतीही संधी उपलब्ध नसते. कारण सर्वच देश असे लोक बेकायदेशीरपणे देशात आले आहेत असे मानतात. परंतु त्यातून फायदा मिळवणारे दलाल कुठल्याही शिक्षेशिवाय निसटून जातात. आता मात्र त्यांना ही संधी मिळणार नाही.

1993 मधील मुंबई बॉम्बस्फोटाशी संबंधित दाऊद इब्राहिम आणि त्याचे साथीदार पळून जात परदेशामधे राहून भारताविरुद्ध कटकारस्थाने करत असल्याची बाबही आपण जाणतो. याच पद्धतीने पंजाबमध्ये अनेक गुन्हेगार खंडणी, खून आणि अन्य गुन्हे करून भारतातून पळून जात कॅनडामध्ये खलिस्तानी बनून राहिले आहेत. पूर्वीच्या भारतीय दंड संहितेमधे आरोपीला न्यायालयासमोर हजर केल्याशिवाय पुढील कायदेशीर कारवाई करता येत नसे. मात्र यावर प्रभावी उपाय करण्यासाठी भारत सरकारने भारतीय दंड संहिता रद्द करून भारतीय न्याय संहिता लागू केली आणि परिणाम दिसू लागला. खेरीज या गुन्हेगारांनी भारतात आणि भारताबाहेर गैरकायदेशीर मार्गाने कुठे, कोणती संपत्ती ठेवली आहे हे शोधून काढण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2015 मधे इंटरपोलला विनंती केली होती. हे करत असताना स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांना सीबीआयमार्फत इंटरपोलकडे जाणे किचकटीचे काम होते. त्यामुळेच यावर प्रभावी उपाय म्हणून भारताने भारतातील फौजदारी प्रक्रियेत बदल करून आरोपीच्या गैरहजेरीत त्याच्याविरुद्धचा खटला चालवता येईल, अशी महत्त्वाची सुधारणा केली. पुढचे पाऊल म्हणजे आता स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांना सीबीआयमार्फत इंटरपोलकडे पत्रव्यवहार करता यावा यासाठी ‘भारतपोल’ हे संकेतस्थळ सुरू केले आहे. भारताने केलेल्या विनंतीची दखल घेऊन इंटरपोलनेही आता बेकायदेशीर संपत्तीसंबंधी सिल्व्हर नोटीस लागू करण्यास मान्यता दिली आहे.

सध्या भारताचे 45 देशांबरोबर सहकार्याचे करार आहेत. त्यातून गैरकायदेशीर संपत्तीची माहिती कळवली जाते. परंतु आता इंटरपोलच्या सहाय्याने जगातील सर्व देशांशी संपर्क साधून ही माहिती मिळवणे साध्य होणार आहे.

# अतिघाईचे बळी

**जग एकविसाव्या शतकात आहे. तंत्रज्ञानात भरपूर प्रगती झाली आहे; परंतु सारासार विचार करण्याची शक्ती कमी होत आहे, की काय अशी शंका यावी, अशी स्थिती आहे. समोर दिसत असूनही न उमगलेला मृत्यू सारासार विचार करण्याची ताकद काढून घेतो की काय, असे जळगावमध्ये घडलेल्या रेल्वे दुर्घटनेनंतर वाटून गेले...**

प्रासंगिक

मधुरा कुलकर्णी
लेखिका

देशात उच्च शिक्षितांचे प्रमाण वाढत आहे आणि प्रगत तंत्रज्ञानाचा वापरही वाढीस लागला आहे. ही समाजाच्या आणि एकूणच देशाच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची बाब आहे; परंतु असे असताना माणसांची सदसदविवेकबुद्धी हरवली आहे की काय किंवा माणसाने सारासार विचार करणेच सोडून दिले आहे की काय, असा प्रश्न निर्माण करणाऱ्या घटना समोर येतात तेव्हा समाजस्वास्थ्याची चिंता वाढते. गेल्या काही वर्षांपासून केवळ अफवांमुळे अनेकांचे बळी घेतले जात आहेत, तर काही अफवा सारासार विचार गमावून बसलेल्यांना मृत्यूच्या दारात ढकलत आहेत. पालघर, सांगली, धुळ्यासह महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मुले पळवण्याच्या संशयातून अनेकांचे बळी गेले. ओडिशात पर्यटनाला गेलेल्या काहींना केवळ एका मुलीला पत्ता विचारत असताना अनेकांना आलेल्या संशयातून जीव गमवावा लागला. विविध भागांमध्ये आलेले अफवांचे पीक आणि त्यातून गेलेले निष्पापांचे बळी हे कटू वास्तव आहे. खरे तर एखाद्याविषयी अफवा पसरणे ही नवी बाब नाही. आजवर कोणी व्यक्ती वा तिच्या कुटुंबाबद्दल अफवा पसरवल्या जात; मात्र त्यांची चर्चा तेवढ्यापुरतीच होत असे. त्यातून शांतता आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याचे कधी दिसून आले नाही; मात्र आजच्या प्रगतिशील समाजात मात्र अफवा कायदा आणि सुव्यवस्थेसमोर आव्हान म्हणून उभ्या ठाकल्या आहेत. त्यात अनेकांचा बळी तर जातोच; परंतु काही ठिकाणी अफवांतून दंगलीही घडतात. जळगावची घटना कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करत नाही, हे खरे असले, तरी त्यात अनेकांनी स्वतःहून प्राणांची आहुती दिली, ती केवळ अफवेमुळे. मरणाच्या भयाने मारलेल्या उड्या अखेर मृत्यूच्याच दारात घेऊन गेल्या.

रेल्वेला आग लागल्याच्या अफवेतून जीव वाचवण्यासाठी उड्या मारल्या; परंतु याच उड्या मृत्यूला कारणीभूत ठरल्याची जळगावची घटना पहिली नाही. मुंबईची लाइफ लाइन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकलमध्ये अशीच आग लागल्याच्या अफवा पसरली होती. पश्चिम रेल्वे मार्गावर चर्चगेटवरून सुटलेली लेडीज स्पेशल लोकल कांदिवली स्टेशनमधून पुढे आल्यानंतर ही आग लागल्याची अफवा पसरल्याने एकच गोंधळ उडाला. यामुळे काही महिलांनी भीतीने दुसऱ्या ट्रॅकवर पटापट उड्या मारल्या आणि विरुद्ध दिशेने येणाऱ्या लोकलखाली या महिला सापडल्या. या दुर्घटनेत 49 महिलांचा बळी गेला होता. त्या वेळी लोकलमधील महिलेला धूर येत असल्याचे निदर्शनास आले होते. त्या महिलेने आरडाओरडा केल्याने डब्यात असलेल्या महिलांमध्ये मोठा गोंधळ उडाला. काही महिलांनी या वेळी लोकलची साखळी खेचण्यासाठी प्रयत्न केले; पण लोकल थांबत नसल्याचे दिसताच महिलांनी रेल्वे ट्रॅकवरच उड्या घेतल्या आणि त्यात त्यांचा जीव गेला. या घटनेच्या वेळी मुंबईत मुसळधार पाऊस सुरू होता. ही घटना संध्याकाळी घडली होती. पावसामुळे वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे बचावकार्यातही मोठा अडथळा आला होता.



आता जळगावातील रेल्वे दुर्घटनेमुळे मुंबईतील त्या लेडिज स्पेशल लोकलचा अपघात चर्चेत आला. उत्तर महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यात बुधवारी संध्याकाळी एका ट्रेनला आग लागल्याच्या अफवेनंतर रुळांवर उड्या मारलेले काही प्रवाशी विरुद्ध दिशेने येणाऱ्या कर्नाटक एक्सप्रेसखाली चिरडले. त्यात 13 जणांचा बळी गेला, तर चाळीसहून अधिक लोक जखमी झाले. लखनऊहून मुंबईला येणाऱ्या पुष्पक एक्स्प्रेसमध्ये आग लागल्याची अफवा पसरल्यानंतर जळगावमध्ये अनेक प्रवाशांनी साखळी ओढून ट्रेनमधून उड्या मारल्या. वक्र ट्रॅकमुळे कर्नाटक एक्सप्रेसच्या दृश्यमानतेवर परिणाम झाल्याचे प्रथमदर्शनी समोर आले आहे. त्यामुळे हा अपघात झाला. कर्नाटक एक्सप्रेसच्या चालकाने हॉर्न न वाजवल्याने अपघात झाल्याचे सांगितले जात असले, तरी त्याला आता काहीही अर्थ नाही. जीव वाचवण्यासाठी जेव्हा लोक काहीही करायला तयार होतात, तेव्हा त्यांना आजूबाजूला काय चालले आहे, याची जाणीव नसते. रेल्वे अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, रेल्वेच्या ट्रंक रूटअंतर्गत येणाऱ्या या सेक्शनवर ताशी 100 किलोमीमटरपेक्षा जास्त वेगाने गाड्या धावतात. दोन्ही गाड्यांच्या चालकांनी प्रोटोकॉलचे पालन केले होते. तसेच अपघात टाळण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. ‘पुष्पक एक्स्प्रेस’च्या चालकाने नियमानुसार घटनास्थळी फ्लॅशर दिवे लावले होते. ‘पुष्पक एक्सप्रेस’चा फ्लॅशर लाईट सिग्नल पाहून ‘कर्नाटक एक्सप्रेस’च्या चालकाने ब्रेक लावला होता; परंतु ट्रॅकच्या वक्रतेमुळे ‘कर्नाटक एक्सप्रेस’च्या दृश्यमानतेवर आणि ब्रेकिंग यंत्रणेवर परिणाम झाला. वेगातील गाडी अचानक थांबवली जाऊ शकत नाही.

आता या प्रकरणाची चौकशी होणार आहे. मृतांमध्ये बहुतांश उत्तर प्रदेशातील होते. महाराष्ट्र सरकारने मृतांच्या कुटुंबीयांना पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. जखमींच्या उपचाराचा संपूर्ण खर्चही राज्य सरकार उचलणार आहे. एका वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्याने सांगितले, की एका सामान्य बोगीमध्ये ठिणग्या आणि धूर पसरल्यानंतर अचानक आग लागल्याची अफवा पसरली. ॲक्सल गरम झाल्यामुळे किंवा ब्रेक जॅम झाल्यामुळे असे होते; परंतु सामान्य प्रवाशांना त्याची माहिती नसते. त्यामुळे प्रवाशांमध्ये घबराट पसरली. त्यांनी साखळी ओढून ट्रेन थांबवली आणि अनेक प्रवाशांनी बोगीतून खाली उड्या मारल्या. त्याच वेळी बाजूच्या ट्रॅकवर ‘कर्नाटक एक्स्प्रेस’ आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संपूर्ण जिल्हा प्रशासनाला रेल्वे अधिकाऱ्यांशी समन्वय साधून काम करण्यास सांगितले. जखमींच्या उपचारासाठी तातडीने व्यवस्था करण्यात आली.

जळगाव रेल्वे अपघाताची चौकशी रेल्वे सुरक्षा आयुक्त करणार आहेत. या रेल्वे अपघाताची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. रेल्वे सुरक्षा आयुक्त, मध्यवर्ती मंडळ या अपघाताची चौकशी करणार आहेत. अपघाताचा तपास करण्यासाठी प्रत्यक्षदर्शी आणि प्रवाशांचे जबाब नोंदवले जाणार आहेत. वास्तविक, आगीची अद्याप पुष्टी झालेली नाही. ट्रेनमध्ये आग लागली की नाही, याबाबत कोणताही पुरावा समोर आलेला नाही. आग नसताना ही अफवा कशी पसरली आणि लोकांनी त्यावर विश्वास कसा ठेवला, याचीही आता चौकशी होणार आहे. या प्रकरणात घातपाताचा अँगल तर नाही, याचादेखील तपास केला जाणार आहे. जळगाव येथे महाकुंभला जाणाऱ्या गाडीवर दगडफेक झाल्याची घटना नुकतीच घडली होती. आता या घटनेचा तपासही सर्व बाजुंनी केला जात आहे.

### खेचाखेची

## विसर

एका आरोपीच्या विरोधात कोर्टात उलटतपासणी सुरू असते.

**वकील :** काय रे, तू मालकाला बेशरम, नालायक, मुर्ख असं म्हणालास?

**आरोपी :** होय, मी असं म्हणालो.

**वकील :** तू त्यांना चोर आहेत, असं सुद्धा म्हणालास?

.

**आरोपी :** नाही, तेवढं म्हणायचं विसरलो.

### वेगळे काही

भगवान श्रीकृष्णाच्या लीलांबद्दल आपण बरंच ऐकलं आहे. त्याच्या लीलांची ओळख असणारी एक थाळी अजूनही अस्तित्त्वात आहे. श्रीकृष्णाची ही थाळी पहायची असेल तर श्रीकृष्णाच्या मथुरा या जन्मभूमीपासून ५० किलोमीटर अंतरावरील काम्यवन येथे यायला हवं. या ठिकाणी श्रीकृष्णाने व्योमासुराचा वध केला होता. व्योमासूर येथील एका जवळच्याच गुहेत राहत होता. त्याचा वध केल्यानंतर श्रीकृष्णाने एका कुंडामध्ये स्नान केलं. क्षीरसागर आणि कृष्णकुंड नावाने ती ओळखली जातात. त्यानंतर श्रीकृष्णाने आपल्या सवंगड्यांसोबत भोजन केलं. येथील पर्वतावर थाळी आणि वाटीची चिन्हं आहेत.

### स्टाईल स्टेटमेंट


## लक्षवेधी दुपट्टे

विवाहासारख्या आयुष्यातल्या अत्यंत महत्त्वाच्या प्रसंगी नवरीला छान दिसायचं असतं. वेगळेपण जपायचं असतं. स्वागत सोहळ्यात बऱ्याच मुली लेहंगा चोली परिधान करतात. या पेहरावाची शोभा वाढवतो दुपट्टा. युनिक आणि ट्रेंडी दुपट्टा लक्षवेधी ठरतो. बाजारात विविध रंगांचे, प्रकारचे, डिझाइन्सचे दुपट्टे मिळतात. त्याविषयी...



✽ बॉर्डरवर मिरर वर्क केलेले दुपट्टे सुंदर दिसतात. विशेष म्हणजे ही फॅशन कधीच जुनी होत नाही. त्यामुळे असे दुपट्टे वेगवेगळ्या पारंपरिक पेहरावावरही घेता येतात. ✽ घुंगरू लावलेले दुपट्टेही उठून दिसतात. सध्या अशा दुपट्ट्यांचा ट्रेंड नसला तरी लग्नातल्या एखाद्या सोहळ्यासाठी हा दुपट्टा घेता येईल.

✽ साधेपणा जपणाऱ्या तरुणी टस्सल वर्कवाला दुपट्टा घेऊ शकतात. मेहंदी, संगीत अशा सोहळ्यांसाठी हा दुपट्टा बेस्ट आहे. ✽ दुपट्टे असो किंवा ब्लाउज, छानशी लटकन त्यांची शोभा वाढवते. लग्नातल्या सोहळ्यांसाठी नाजूक गोटा लटकनवाले दुपट्टे घ्या. ✽ गोटा पत्तीचं डिझाइनही हिट आहे. ✽ ‘स्कॅलप्ड बॉर्डर’ दुपट्ट्यांची चलती आहे. दुपट्ट्याच्या बॉर्डरला वेगळ्या डिझाइनची झालर किंवा लेस लावली जाते. याला ‘स्कॅलप्ड बॉर्डर’ म्हणतात.




### राशीभविष्य

- **मेष** : नोकरीत अडचणी निर्माण होतील. प्रवासात प्रकृतीची काळजी घ्या. भांडणतंटा संभवतो.
- **वृषभ** : व्यवसायात मोठी प्राप्ती होईल. प्रकृतीच्या तक्रारी वाढतील. कायदेशीर बाबतीत पुरेशी काळजी घ्या.
- **मिथुन** : शुभयोगाचा उत्तम प्रभाव राहील. मुलांच्या प्रश्नात समाधान लाभेल. मान-सन्मानाचे योग आहेत.
- **कर्क** : ओळखी, मध्यस्थीतून लाभ होईल. भागीदारी व्यवसायात मतभेद संभवतात. वाहन जपून वापरावं.
- **सिंह** : नोकरी-व्यवसायात समाधान लाभेल. करार मार्गी लागतील. शैक्षणिक क्षेत्रात वाव मिळेल.ह्न्ह्न
- **कन्या** : मुलाखतीत यश मिळेल. आई-वडिलांबाबत चिंता राहील. नोकरीत बदली-बढतीचे प्रयत्न होतील.
- **तूळ** : व्यवसायात येणी वसुल होतील. मित्रांशी वाद-विवाद टाळावेत. स्पर्धांमध्ये उत्तम यश प्राप्त होईल.
- **वृश्चिक** : नोकरीत महत्त्वाच्या संधी चालून येतील. कौटुंबिक सौख्य लाभेल. विवाहाच्या प्रयत्नांना वेग येईल.
- **धनु** : समस्यांमधून मार्ग निघेल. प्रेम प्रकरणात अनुकुलता लाभेल. खर्च विचारपूर्वक करावा.
- **मकर** : नोकरीत बदलाचा विचार होईल. धार्मिक स्थळाची यात्रा घडेल. स्थापत्य क्षेत्रात प्रगती करता येईल.
- **कुंभ** : थोरामोठ्यांच्या गाठीभेटी होतील. मुलांना उत्कर्षाच्या संधी लाभतील. ताण-तणावापासून दूर रहावं.
- **मीन** : मनासारख्या घटना घडतील. कर्जाची परतफेड शक्य होईल. मुलांच्या प्रश्नांकडे लक्ष द्यायला हवं.

### सल्ला मोलाचा

## मुरुमं कशामुळे?

पौगंडावस्थेत चेहऱ्यावर मुरुमं येतात. या काळात शरीरातील हार्मोन्सशी संबंधीत बदल झाल्याने मुरुमं येतात. शिवाय या वयात मुलं तणावाला लवकर बळी पडतात. पिअर प्रेशर आणि नेहमी सुंदर दिसण्याचा दबाव त्यांच्या मनावर असतो. त्यामुळे या स्थितीत मुलांवर होणारा मनोवैज्ञानिक परिणाम आई-वडिलांनी समजून घेतला पाहिजे. या परिस्थितीत योग्य मार्गदर्शन करु शकणाऱ्यांची मुलं या समस्येतून बाहेर येऊ शकतात. सुमारे ५० टक्के तरुण महिला आणि २५ टक्के पुरुषांना आपल्या तारुण्यात या समस्येचा सामना करावा लागतो. अनेक महिला यामुळे डिप्रेशनची अर्थात नैराश्याची शिकार होतात. मुरुमं येण्याला अनेक कारणं असू शकतात. जसं की, हवामानाचा परिणाम, शारीरिक आणि हार्मोन्सशी संबंधीत बदल वगैरे. एखादी स्त्री तणावग्रस्त होते त्यावेळी शरीरात कोर्टिसोल हार्मोन्सचा स्त्राव वाढतो. शरीराच्या त्वचेच्या ग्रंथीतून सीवम नावाच्या हार्मोन्सच्या स्त्रावाचं प्रमाण वाढल्यामुळे मुरुमं येतात. कारणं काहीही असली तरी आपल्यावरील तणाव योग्य पद्धतीने हँडल करता यायला हवा.

### दिनविशेष

## २४ जानेवारी

- **१९५०** : ‘जन-गण-मन’ या गीतास राष्ट्रगीत म्हणून मान्यता.
- **१९६६** : भीषण विमान दुर्घटनेत अणुशास्त्रज्ञ होमी भाभा यांचे निधन.
- **२०१३** : दहशतवादी हेडलीला ३५ वर्षे तुरुंगवासाची शिक्षा.
- **२०१४** : खलिस्तानवादी दहशतवादी देविंदरपालसिंग भुल्लर याच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालय फेरविचार करणार असल्याची माहिती.
- **२०१६** : सत्तारुढ भारतीय जनता पक्षाच्या अध्यक्षपदी अमित शहा यांची बिनविरोध फेरनिवड.

### महत्त्वपूर्ण काही...

## वनस्पतींचं मोलाचं कार्य

काल जाणून घेतलेली वनस्पतींची अन्नप्रक्रिया केवळ जमिनीवरील वनस्पतींतच घडते, असं नाही; तर पाण्यातील, समुद्रातील वनस्पतीसुद्धा याच पद्धतीने अन्न तयार करतात. यामुळेच पाण्यामध्ये जेथवर सूर्यप्रकाश पोहोचतो, तिथवरच वनस्पतींची वाढ झालेली आढळते. त्याच्या खालील पातळीवर वनस्पती जीवन आढळत नाही. जमिनीवरसुद्धा सूर्यप्रकाश पोहोचत नाही, त्या भागात वनस्पतिजीवन फार वाढू शकत नाही.

वनस्पती स्वतःचं अन्न तयार करताना समस्त प्राणिजीवनावर दोन प्रकारे उपकार करत असतात. एकात प्राणवायू बाहेर टाकला जात असल्याने प्राण्यांना अत्यंत आवश्यक अशा वायूचं वातावरणातील प्रमाण कायम राखलं जातं, तर अनावश्यक असा, प्राण्यांनी हवेत सोडलेला कार्बन डायऑक्साइड त्यात शोषून घेत असतात. वनस्पतींची अन्नप्रक्रिया अन्न तयार करूनच थांबते, असं नव्हे; तर वनस्पती नाश पावतात, त्यावेळी त्यांच्या अवशेषांतूनसुद्धा पुन्हा वनस्पतींना उपयुक्त अशा स्वरूपाचे घटक तयार होऊन जमिनीला मिळतात. यामुळेच अन्नसाखळीचा वनस्पती हा एक प्रमुख घटक आहे.

### पंचांग

**शुक्रवार, २४ जानेवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
पौष कृ. १०, नक्षत्र : अनुराधा
चंद्रराशी : वृश्चिक, वृद्धी योग,
सूर्योदय : ७.१४, सूर्यास्त : ६.२६

### फॉरवर्डस

**तत्त्वनिष्ठांची वाट नेहमीच खडतर असते...**

बहुत सारे छाले है उसके पैरो में,
कमबख्त वो जरूर उसूलों पे चला होगा...

### आरोग्यमंत्र

## मीठ हवं मर्यादितच

आहारात मिठाचं प्रमाण वाजवीपेक्षा अधिक असू नये, असा सल्ला आवर्जून दिला जातो. याचं कारण मिठाचं अधिक प्रमाणातील सेवन काही व्याधींना निमंत्रण देणारं ठरतं. आहारात मीठाचं जास्त प्रमाण असेल तर रक्तप्रवाहाचा वेग वाढतो आणि रक्तवाहिन्यांवर अतिरिक्त ताण येतो. संपूर्ण शरीरात रक्तप्रवाह योग्य दाबाने सुरू राहण्यासाठी मग हृदयाला खूप मेहनत करावी लागते. यामुळे उच्च रक्तदाब आणि हृदयविकाराची समस्या निर्माण होते. तसंच ऑस्टिओपोरोसिस, मूतखडा, अस्थमा आणि गॅस्टीक कॅन्सर असे विकार होण्याची शक्यताही वाढते. यावरून मिठाचं मर्यादित प्रमाणात सेवन किती महत्त्वाचं आहे हे लक्षात येईल. त्यादृष्टीने मिठाचं प्रमाण कसं कमी करता येईल ते जाणून घेऊ...




✽ मिठाचं प्रमाण कमी करण्यासाठी चीज, पापड, लोणची, खारवलेले काजू, पिस्ते, वेफर्स, फरसाण, सोया, टोमॅटो, मायोनिज आणि इतर सॉस, ब्रेड, इस्टंट सूप, नूडल्स, पास्ता असे पदार्थ टाळावेत. ✽ पोटॅशियममुळे शरीरातलं सोडियमचं प्रमाण नियंत्रणात राहतं. यामुळे केळं, संत्र, पीच, टरबूज, पालक अशी पोटॅशियमचं प्रमाण जास्त असणारी फळं आणि भाज्या खाव्यात ✽ शरीरातलं सोडियमचं प्रमाण कमी करण्यासाठी पाण्याचं प्रमाण वाढवावं. ✽ मांस आणि भाज्या साठवण्यासाठी मीठाच्या पाण्याचा वापर केला जातो. त्यामुळे हे घटक स्वच्छ धुवून घ्या.

### वाचा तर खरं

भयपटामधील नायिकेला बाथरूममधील आरशात दिसणारं भूत तिला घाबरवतंच त्याचबरोबर क्षणभर का होईना प्रेक्षकांचा थरकाप उडतो. पण या दृश्याचा वैज्ञानिक संदर्भही आहे बरं का! मंद प्रकाश असणाऱ्या खोलीतील आरशासमोर दहा मिनिटांहून अधिक काळ थांबलो तर मेंदू कंटाळतो. परिणामी तुमच्याच प्रतिमांना चित्रविचित्र आकारात दाखवण्याचा प्रयत्न करतो. त्यातून कल्पनेतील भूतं आसपास तरंगत असल्यासारखी वाटतात. पटत नसेल तर करून पहा! घाबरलात तर आम्ही जबाबदार नाही.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ **http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com**

» Selected

## विन्हाम येथे भीमशक्तीच्या शाखेचे उद्घाटन



**खेड :** विन्हाम (ता. खेड) येथे भीमशक्ती संघटनेच्या १६० व्या शाखेचे उदघाटन जिल्हाध्यक्ष विजय डोळस यांच्या हस्ते रविवारी (दि २२) झाले. संघटनेचे तालुका अध्यक्ष अनिल जाधव, खेड पश्चिम विभाग अध्यक्ष मारुती शिंदे, कार्याध्यक्ष विकास शिंदे, सुभाष शिंदे, संतोष शिंदे, विलास रोकडे, अक्षय घोडके, निलेश वाघमारे, सोनू भालेराव, वि-हाम भीमशक्ती शाखा प्रमुख एकनाथ रोकडे, अध्यक्ष अर्जुन रोकडे, उपाध्यक्ष शंकर रोकडे, कार्याध्यक्ष किरण रोकडे, गौतम रोकडे, सचिव नितीन रोकडे, विलास रोकडे, मधुकर रोकडे, सिद्धार्थ रोकडे, मधुकर रोकडे, कचर रोकडे, संजय रोकडे,राजाराम रोकडे, विश्वनाथ रोकडे,भीमराव रोकडे, संतोष रोकडे, प्रकाश रोकडे, प्रदीप रोकडे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला नागरिक उपस्थित होते. प्रास्ताविक किसन रोकडे यांनी केले, आभार अर्जुन रोकडे यांनी मानले.

## संस्कार वेचावे लागतात : आ. ज्ञानेश्वर कटके



**उरुळी कांचन :** संस्कार वेचावे लागतात सांगून मिळवता येत नाहीत, असे प्रतिपादन शिरूर हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी केले. ते उरुळी कांचन ग्रामीण विकास प्रतिष्ठानच्या "उरुळी कांचन फेस्टिव्हल २०२५ " या नवीन वर्षाच्या स्वागता प्रित्यर्थ आयोजित सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन करताना बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ नेते के. डी. कांचन होते तर प्रमुख पाहुणे म्हणून बाजार समितीचे सभापती दिलीप काळभोर, यशवंतचे अध्यक्ष सुभाष जगताप, म.गांधी सर्वोदय संघाचे सचिव सोपान कांचन, सरपंच अमितबाबा कांचन आदी उपस्थित होते. आमदार ज्ञानेश्वर कटके म्हणाले की, पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण थांबवून आपल्या पूर्वजांनी निर्माण केलेल्या ऐतिहासिक संस्कृतीचे जतन... रक्षण... अनुकरण करणे काळाची गरज झाली आहे. त्याची आठवण प्रबोधनातून करून देण्यासाठी या सांस्कृतिक महोत्सवासारख्या व्यासपीठांची असलेली गरज भागविण्याचे काम उरुळी कांचन ग्रामीण विकास प्रतिष्ठान गेल्या २२ वर्षांपासून सातत्याने करीत आहे ते कौतुकास्पद आहे, असेही ते म्हणाले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजाराम कांचन यांनी प्रास्ताविक केले. ज्योती पंडित यांनी सूत्रसंचालन केले, तर सचिव संजय टिळेकर यांनी आभार व्यक्त केले.

## वाहन चालविताना स्वयंशिस्त महत्वाची



**बारामती :** रस्त्यावर वाहन चालवितांना स्वयंशिस्त महत्वाची असून स्वतःसोबत इतरांची काळजी घेणे गरजेचे आहे; रस्ते सुरक्षा विषयक नियमांचे पालन केल्यास आपल्याला अपघात टाळता येईल, असे प्रतिपादन प्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम यांनी केले. इंदापूर येथे परिवहन कार्यालय, पोलीस स्टेशन, कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय आणि विद्या प्रतिष्ठान पॉलिटेक्निक महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रस्ता सुरक्षा जनजागृती फेरी व रक्तदान शिबीराप्रसंगी ते बोलत होते. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी पद्माकर भालेराव, विद्या प्रतिष्ठान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. देशपांडे, प्राचार्य डॉ. जीवन सरवदे,राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विद्यार्थी कल्याण मंडळ, राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी उपस्थित होते. निकम म्हणाले, परिवहन विभागाच्यावतीने ३१ जानेवारी २०२५ पर्यंत 'रस्ता सुरक्षा अभियान' राबविण्यात येत असून त्यानंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. रस्ता सुरक्षा अभियान कार्यक्रमाचे ब्रीद वाक्य 'परवाह' असे असून 'परवाह' म्हणजे काळजी घेणे. त्यामुळे वाहन चालविताना आपल्या जीवाची काळजी घ्यावी, असेही ते म्हणाले.

# गौण खनिज : १२ कोटींचा दंड

## अवैध उत्खनन केल्यावरून खेडच्या तहसीलदारांनी ठोठावला दंड

■ निखिल पाचारणे




सिद्धेगव्हाण येथे अवैध रित्या झालेले उत्खनन क्षेत्र.

**खेड :** खेड तालुक्यातील शासकिय गायरान आणि खासगी जागेत अवैध उत्खनन केल्यावरून खेडच्या तहसीलदार ज्योती देवरे यांनी तब्बल १२ कोटी,६ लाख,४० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. सिद्धेगव्हाण, ता. खेड येथील २३२/१ आणि २३२/२ या गटात हे उत्खनन झाले आहे. खेडच्या तहसीलदार देवरे यांनी नुकताच हा आदेश दिला आहे. जमीन अवैध उत्खननात एवढ्या मोठ्या रकमेचा दंड ठोठावला जाण्याची ही पहिली वेळ असल्याचे मानले जात आहे. माहिती अधीकार कार्यकर्ते पै. बाळासाहेब चौधरी यांनी पाठपुरावा केला. अनिल धोत्रे आणि ज्ञानेश्वर पाठारे अशी दंड झालेल्या व्यक्तींची नावे आहेत.

फेब्रुवारी २०२४ मध्ये हे उत्खनन झाले आहे. या प्रकरणात सिद्धेगव्हाणचे तत्कालिन सरपंच, उपसरपंच, सदस्य व ग्रामस्थांनी तेव्हाचे तत्कालिन तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्या कडे तक्रार केली होती. मंडळ अधिकारी माणिकराव गायकवाड व गाव कामगार तलाठी सतीश शेळके यांनी पंचनामा केला होता. त्यानुसार १ लाख,६८ हजार ब्रास मुरूम मातीचे उत्खनन केल्याचा अहवाल तहसीलदारांना देण्यात आला होता. हे उत्खनन करून जवळपास १ हेक्टर ५२ आर जमीन तयार करण्यात आली. त्यात चढ उतार असलेली शासकिय गायरान व खासगी क्षेत्र असलेल्या जमिनीचा समावेश आहे. याशिवाय नकाशावर अधोरेखित असलेला सिद्धेगव्हाण ते वाजेवाडी रस्ता विकासकांनी उखडून टाकला असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यानंतर या प्रकरणाची सुनावणी तहसीलदार ज्योती देवरे यांच्या कडे सुरू होती. ११ जानेवारी रोजी या बाबतचा निकाल देण्यात आला आहे.

> खेड तालुक्यात उत्खनन, वाहतूक व साठा याबाबत अनेकदा तक्रारी होतात. परंतु संबंधितांवर झालेल्या दडा बाबत प्रशासन बेदखल राहाते. वसुली होत नाही. विलंब होतो.अधिकारी बदलतात आणि अनेकदा अशा प्रकरणात तडजोडी होतात. त्यामुळे दंड वसुल होत नाही. शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बुडतो. असे गेली अनेक वर्षे सुरू आहे. तहसीलदार ज्योती देवरे यांनी सध्याची जलद आणि निर्भयपणे केलेली कारवाई कौतुकास्पद आहे.
>
> **- पै. बाळासाहेब चौधरी,** माहिती अधीकार कार्यकर्ता, गोलेगाव, खेड

## कोरेगाव भीमात रिक्षा चालकाचा खून

**शिक्रापूर :** कोरेगाव भीमा येथे दोन रिक्षा चालकांच्या झालेल्या शाब्दिक वादातून तिघांनी रिक्षाचालकाला दगडाने बेदम मारहाण करत फरार झालेले असताना शिक्रापूर रिक्षाचा शोध घेत आरोपींना अटक केली असून सोमेश अशोक सरोदे, दिपक राजू साठे व ज्ञानेश्वर कांतीलाल डूकळे असे पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

कोरेगाव भीमा येथे रिक्षा चालक राजेंद्र मुंगसे हे रिक्षातून चाललेले असताना, पाठीमागून आलेल्या एका रिक्षा चालकाशी शाब्दिक वाद झाले. पाठीमागून आलेल्या रिक्षा चालकासह त्यामध्ये असलेल्या दोघा युवकांनी राजेंद्र यांना बेदम मारहाण केली. त्यानंतर पाठीमागून आलेल्या रिक्षातील तिघेजण पळून गेले. याबाबत अनल राजेंद्र मुंगसे (३०, रा. आनाजीचा मळा वढू बुद्रुक, ता. शिरुर) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली. पोलिसांनी तिघा अज्ञातांवर गुन्हा दाखल केला. पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या पथकाने सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून रिक्षाचा शोध घेतला असता पुण्यातील कुदळवाडी परिसरात जात रिक्षासह तिघांना ताब्यात घेतले.

# राजगुरुनगरमध्ये मॅरेथॉन उत्साहात

## स्व. बाळासाहेब आपटे यांच्या जयंतीनिमित्त केले होते आयोजन



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** राज्यसभेचे माजी खासदार स्व. बाळासाहेब आपटे यांच्या जयंतीनिमित्त राजगुरुनगर येथे रविवारी (दि २२) मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन केले होते. राजगुरुनगर येथील बाळासाहेब आपटे स्मृती समिति आणि लायन्स क्लबच्यावतीने या स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी हुतात्मा स्मृती शिल्पस्थळावरुन गुन्हे शाखेचे पोलीस उपआयुक्त निखील पिंगळे यांच्या हस्ते स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला.

याप्रसंगी शहरातील संघटना, संस्थाचे पदाधिकारी, महिला, युवक युवतीसह स्पर्धक मोठया संख्येने उपस्थित होते. स्व. बाळासाहेब आपटे स्मृती समितीचे अध्यक्ष ॲड.गणेश सांडभोर, सचिव स्वानंद खेडकर,शरद जोशी, लायन्स क्लबचे अध्यक्ष नितीन दोंदेकर, सचिव मनिष बोरा, खजिनदार विजय घोरपडे, हुतात्मा राजगुरु फांऊडेशनचे अध्यक्ष बाळासाहेब सांडभोर आदिसह क्रीडाशिक्षिक, शिक्षिकानी आयोजनात सहभाग घेतला. मॅरेथॉन साठी एस टी.बसस्थानक ते शहरातील आपटे वाड्यापर्यंत दौड घेण्यात आली.

विजेत्यांना पुणे शहर गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलिस उपआयुक्त निखिल पिंगळे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या स्पर्धेत मुलींमध्ये मानसी यादव, साक्षी बोऱ्हाडे, अदिती हरगुडे, आर्या डोके, आदिती तांबे, श्रुती पारधी, श्रावणी गाढवे, इच्छा जाधव तर महिला गटात ज्येष्ठ नागरीक मोनाली चौधरी, तर मुलांमध्ये सतीश पटेबहादुर, सचिन भारद्वाज, हर्षद गाडे, माणिक गिरीगोसावी, राहुल पारधी, सुरज मुंगसे, सौरभ मुळुक, ऋतिक इंगळे यांच्यासह पुरुष गटात नवनाथ कोकणे, किसन सांडभोर, मारुती प-हाड यांनी विजेतेपद पटकावले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड.गणेश सांडभोर यांनी केले, तर आभार डॉ. सागर गुगळीया यांनी मानले.

## बारामतीमधून दोघे वर्षाकरिता तडीपार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**बारामती :** बारामती शहर पोलिसांनी आमराई परिसरातील धीरज रवींद्र पडकर व तुषार उर्फ चिंट्या मारुती सोनवणे (दोघेही रा. एसटी स्थानकासमोर आमराई, बारामती) या दोघांना पुणे जिल्ह्याच्या पुणे जिल्हा, शहर व पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयासह फलटण तालुक्याच्या हद्दीतून एक वर्षाकरिता तडीपार केले आहे.

या संदर्भातील माहिती पोलीस निरीक्षक विलास नाळे यांनी दिली. या दोघांवर दरोडा, जबरी चोरी, खुनाचा प्रयत्न, विनयभंग, गर्दी मारामारीसह दुखापत यासारखे गुन्हे असून, धीरज रवींद्र पडकर याने स्वतःची टोळी तयार केली असून तो या टोळीच्या माध्यमातून वरील कृत्ये बारामती शहर व तालुक्याच्या परिसरात करीत आहे. या कृत्याला त्यांनी व्यावसायिक स्वरूप दिल्यामुळे बरीच बेरोजगार तरुण मुले कष्टाविना मिळणाऱ्या पैशामुळे या वाईट प्रवृत्तीकडे आकर्षित होताना दिसत आहेत. यातून सामान्य लोकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून, मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे त्यांच्या कृत्याला आळा बसावा यासाठी ही कारवाई करण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक विलास नाळे यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांच्याकडे हा प्रस्ताव सादर केला होता त्यानुसार ही कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विलास नाळे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, फौजदार सतीश राऊत, सागर जामदार, अक्षय सिताप, अमीर शेख, दत्तात्रय मदने, अमोल देवकाते, महेश बनकर, रामदास बाबर यांच्या पथकाने केली.

## खरपुडीत ज्ञानयन सोहळा उत्साहात साजरा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** खरपुडी येथे स्वर्गीय सोपानराव भाऊसाहेब भोगाडे आणि स्वर्गीय बबाबाई सोपानराव भोगाडे यांच्या चौथ्या पुण्यस्मरणानिमित्त श्रीरामकथेचे आयोजन करण्यात होते. पंचक्रोशीतील नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला.

खरपुडीचे आदर्श सरपंच कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक जयसिंग भोगाडे व कुटुंबियांनी आई-वडिलांच्या स्मृती जपण्यासाठी खरपुडी गावात गावच्या वैभवात भर पडेल यासाठी आकर्षक कमान उभारली. पंचक्रोशीतील महिला व नागरिकांसाठी रामकथेचे आयोजन केले होते. रामायणाचार्य हभप साधवी वैष्णवी सरस्वती दीदी यांच्या अमृत रसाळ वाणीतून रामकथा सादर झाली. श्रीराम कथा ज्ञानयन सोहळ्यात कथा हुबेहूब रंगवली जात असल्यामुळे संपूर्ण मंडप व परिसर भक्तिमय झाला होता.

दीप्तीताई प्रसाद भोगाडे यांनी या वर्षातील पहिला सण म्हणून मगर संक्रातीनिमित्त महिलांची ओटी भरून तिळगुळ दिले. जयसिंग भोगाडे, बाजीराव भोगाडे, माणिक भोगाडे, राजू भोगाडे, मयूर भोगाडे, प्रसाद भोगाडे यांनी येणाऱ्या पाहुण्यांचे स्वागत केले. दरम्यान आमदार बाबाजी काळे, माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे पाटील, संचालक सागर मुऱ्हे, माणिक गोरे,कमल कड,विनोद टोपे, हनुमंत कड, माजी सभापती कैलास लिंभोरे, कैलास सांडभोर, नवनाथ होले, सरपंच सोनम श्रीकांत होले आदी उपस्थित होते.

## पुण्यसमरण...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**खेड** खरपुडी येथे स्वर्गीय सोपानराव भाऊसाहेब भोगाडे आणि स्वर्गीय बबाबाई सोपानराव भोगाडे यांच्या चौथ्या पुण्यस्मरणानिमित्त श्रीरामकथेचे आयोजन करण्यात होते.

### राम कथेदरम्यान आमदार बाबाजी काळे यांच्याकडून राजकिय 'कृष्णलीले'ची स्पष्टोक्ती

# बाजार समितीला जयसिंग भोगाडे यांना मदत... नेमका कुणाचा पत्ता कट?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** खेड बाजार समितीच्या निवडणुकीत'त्या'पॅनल मध्ये असलेल्या जयसिंग भोगाडे यांना मदत केली. ही बाब समोर आली तेव्हा मग'या'पॅनलमध्ये नेमके कोणाला टाळले..? अशी विचारणा अनेकांनी केली. असा खुलासा आमदार बाबाजी काळे यांनी केला आणि उपस्थितांमध्ये हशा पिकला, जोरदार टाळ्या झाल्या. मात्र आमदार बाबाजी काळे यांच्या या वक्तव्यामुळे खेड तालुक्याच्या राजकिय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चेला उधाण आले आहे. खेड कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक जयसिंग भोगाडे यांनी विरोधी म्हणजेच माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या पॅनल मधुन निवडणुक लढवली होती. खरपुडी बु., ता.खेड येथे स्व. सोपानराव भाऊसाहेब भोगाडे आणि स्व. बबाबाई सोपानराव भोगाडे यांच्या चौथ्या पुण्यस्मरणानिमित्त श्री रामकथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. साध्वी वैष्णवी सरस्वती दीदी यांच्या सुश्राव्य कथनाद्वारे सादर झालेल्या ज्ञानयज्ञ सोहळ्याला तालुक्यासह पंचक्रोशीतील महिला व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळला. सोमवारी ( दि २०) राज्याभिषेक सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी आमदार बाबाजी काळे यांनी उपस्थित राहुन कार्यक्रमाच्या आयोजना बद्दल बाजार समितीचे संचालक जयसिंग भोगाडे यांचे कौतुक केले.



खरपुडी येथे आयोजित कार्यक्रमात आमदार बाबाजी काळे यांचा सन्मान करताना जयसिंग भोगाडे व इतर.

यावेळी बोलताना आमदार बाबाजी काळे यांनी काही महिन्यापूर्वी झालेल्या खेड बाजार समितीच्या निवडणुकीत विरोधी पॅनल मधुन असले तरी जवळचे नातेवाईक असल्याने जयसिंग भोगाडे यांना मदत केल्याचा खुलासा केला. या निवडणुकीत आमदार बाबाजी काळे हे माजी आमदार मोहिते पाटील यांच्या विरोधी पॅनलचे प्रमुख म्हणुन काम पाहात होते. भोगाडे मोठ्या मताधिक्याने निवडून आले. मात्र भोगाडेना केलेली मदत उघड झाल्यावर तालुक्यातील अनेकांनी तुमच्या पॅनल मधील कुणाला सोडले? अशी विचारणा केली. असे आमदार काळे यांनी खरपुडी येथे सांगितले. त्यांच्या या बोलण्यावर उपस्थितांमध्ये प्रचंड हशा पिकला. असे असले तरी आमदार काळे यांनी त्या निवडणुकीत स्वतःच्या पॅनल मधील कुणाला टाळले यावर भाष्य करायचे टाळले. परिणामी त्यांच्या या बोलण्यावर तालुक्यात राजकिय कुरघोडी झाल्याच्या उलट सुलट चर्चा सुरू झाल्या आहेत. दरम्यान, माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी मंगळवारी (दि २१) सांगता समारंभात उपस्थित राहुन कार्यक्रमाच्या आयोजनाचे तोंडभरून कौतुक केले.

### जयसिंग भोगाडे जिपचे संभाव्य उमेदवार?

● विधान सभा निवडणुकी नंतर खेड तालुक्यात जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीचे वारे वाहत आहेत. विधानसभेत उध्दव ठाकरेंच्या शिवसेनेचे उमेदवार बाबाजी काळे यांचा विजय झाला. त्यानंतर येणाऱ्या निवडणुकांची गणितं बदलणार हे निश्चित मानले जाते. या पार्श्वभूमीवर खरपुडी बू. येथे आयोजित करण्यात आलेल्या श्रीराम कथा सोहळा तालुक्यात गाजला . आठ दिवसातील भाविकांची आणि तालुक्यातील सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते यांची उपस्थिती लक्षवेधी ठरली. त्यातच आमदार बाबाजी काळे यांनी जयसिंग भोगाडे यांच्याशी असलेली जवळीक आणि भविष्यात साथ देण्याचे आश्वासन देत भोगाडे यांच्या उमेदवारीवर जवळपास शिक्कामोर्तब केले. माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या जवळचे व कट्टर म्हणुन भोगाडे यांची तालुक्यात ओळख आहे. ते आता नेमकी काय भूमिका घेणार याकडे समर्थका बरोबरच विरोधकांचे देखील लक्ष लागून राहणार आहे. गट रचना, आरक्षण प्रत्यक्षात आल्यावर भोगाडे रिंगणात असतील असे मानले जात आहे.




**शेर की जुबानी**

* तसल्ली से पढे होते... तो समझ
में आते हम,
जरूर कुछ पन्ने,
बिना पढे ही पलट दिए होंगे।

गुस्से में कुछ और भी
हसीन लगते हो,
बस यही सोच कर
तुमको खफा रखा है।

ख्वाहिशों का आदी दिल काश
ये समझ सकता,
कि सांस टूट जाती है, एक आस
टूट जाने से।

**स्मार्ट टिप्स**

## अकाउंट हॅक झालंय?

सध्या अकाउंट हॅक होण्याचं प्रमाण बरंच वाढलं आहे. फेसबुक, इन्स्टाग्रामसारखी सोशल नेटवर्किंग ॲप्स हॅक होऊ शकतात. म्हणूनच आपण काळजी घ्यायला हवी. सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी इन्स्टाग्रामची मूळ कंपनी मेटाने नवं व्यासपीठ सादर केलं असून यामुळे युजर्सना हॅक झालेली खाती परत मिळवता येणं शक्य होणार आहे. इन्स्टाग्रामवर युजर्स बनावट क्रिप्टोकरंसी रिटर्न्सच्या माध्यमातून युजर्सना लुभावण्याचं काम करतात आणि त्याद्वारे त्यांच्या खात्यावर ताबा मिळवतात. इन्स्टाग्राम डॉट कॉम/ हॅक्ड नावाचं हे व्यासपीठ असून त्यावर खातं हॅक झाल्याची तक्रार नोंदवता येऊ शकते. या नव्या व्यासपीठावर खात्याच्या सुरक्षेसंबंधीची सगळी टूल्स उपलब्ध असून या माध्यमातून युजर्सची खाती सुरक्षित ठेवणं शक्य होणार आहे.

# थंडीतही सुरू ठेवा व्यायाम



**फिटनेस**

हुडहुडी भरवणाऱ्या थंडीत सकाळी उठून व्यायाम करणं जीवावर येतं. अंगावरचं पांघरून बाजूला करावंसं वाटत नाही. पण तासभर झोपण्यासाठी आपण आपल्या आरोग्याकडे, फिटनेसकडे दुर्लक्ष करतो. एखाद्या दिवशी झोपणं ठीक आहे. पण दररोजचा आळस उपयोगाचा नाही. थंडीच्या दिवसातही स्वत:ला व्यायामासाठी कसं सज्ज करता येईल याबाबतच्या काही टिप्स...

1. थंडीत घराबाहेर पडायचं नसेल तर घरीच व्यायाम करा. योगा, जॉगिंग, डान्स असं काहीही करता येईल. घरच्या घरी करण्यासारखे साधेसोपे व्यायामप्रकार आहेत. हे व्यायाम करून तुम्ही फिट राहू शकता.
2. दररोज एकाच प्रकारचा व्यायाम करून कंटाळा येतो. मग व्यायाम टाळला जातो. व्यायाम एकसुरी होत असेल तर डान्स, जीम, योगा, धावणं असं वैविध्य आणण्याचा प्रयत्न करा. यामुळे तुम्हाला दररोज व्यायाम करावासा वाटेल.
3. व्यायाम करण्यामागची कारणं टिपून ठेवा. काही जण वजन कमी करण्यासाठी किंवा फिटनेससाठी व्यायाम करतात. आपल्याला व्यायामाची गरज का आहे, त्यामागचा आपला उद्देश काय हे लिहून ठेवलं की तुम्हाला व्यायामाची प्रेरणा मिळेल.
4. व्यायामासाठी एखादा जोडीदार सोबत घ्या. फिटनेसची आवड असणाऱ्या मित्राची किंवा मैत्रिणीची निवड करा. ही मंडळी तुम्हाला व्यायामाची प्रेरणा देतील.

इस्रोसारख्या संघटना अंतराळात यशस्वी झेप घेत आहेत. आज आपल्याला युवा अंतराळवीरांची गरज आहे. हे अंतराळवीर पुढे भारताचं भविष्य ठरू शकतात. रात्रीच्या निरभ्र आकाशात असंख्य तारे-तारका दिसत असतात. अनेकांना आकाश निरिक्षण करायला आवडतं. यात लहानग्यांची संख्या बरीच जास्त आहे. मात्र ही संधी प्रत्येकाला मिळतेच असं नाही. म्हणूनच अवघ्या २१ वर्षांचा आर्यन मिश्रा अंतराळविषयक प्रयोगशाळा उभारण्यासाठी प्रयत्नशील आहे.



# खगोलशास्त्राच्या प्रेमापोटी

**अचिव्हर**




आर्यन मिश्रा... अवघ्या २१ वर्षांचा तरुण. आर्यनला भारतभरात ५०० अंतराळविषयक प्रयोगशाळा उभारायच्या आहेत. आर्यनचे वडील पेपर विक्रेता. अशाच एका रात्री आर्यन कुटुंबासोबत गच्चीवर झोपायला आला. ते उन्हाळ्याचे दिवस होते. अवघ्या सात वर्षांच्या आर्यनला आकाशात असंख्य तारे पहायला मिळाले. तो अक्षरश: हरखून गेला. हे तारे मुठीत घ्यावे असं त्याच्या मनात आलं. या आवडीचं रुपांतर छंदात झालं. आकाश निरिक्षणाच्या छंदाने आर्यनला झपाटून टाकलं. इथूनच त्याच्या प्रवासाला सुरूवात झाली. सातवीत असताना त्याला टेलिस्कोपची माहिती मिळाली. टेलिस्कोपमधून आकाश निरिक्षण करणं हा अनोखा अनुभव असतो हे त्याच्या लक्षात आलं. मग त्याने घरच्यांकडे टेलिस्कोपची मागणी केली.

टेलिस्कोप घेऊन देणं आर्यनच्या वडीलांसाठी बरंच खर्चिक होतं. घरच्यांनी समजवायचा प्रयत्न केला. पण आर्यनला आकाश निरिक्षणाच्या वेडाने पछाडून टाकलं. टेलिस्कोपसाठी त्यानेच पैसे जमवायला सुरूवात केली. आर्यन शाळेत चालत जावू लागला. एकवेळचं जेवणही कमी केलं. त्याच्याकडे पाच हजार रुपये साठले, छानशी टेलिस्कोप आर्यनच्या घरात आली. आर्यन फिजिक्स शिकतो आहे. यासोबत अंतराळविषयक प्रयोगशाळेच्या माध्यमातून तो मुलांना अनोख्या सुविधाही उपलब्ध करून देत आहे. त्याच्या प्रयत्नांमुळे अंतराळच शाळेच्या वर्गात अवतरू लागलं आहे.

२०१९ मध्ये त्याने या उपक्रमाला सुरूवात केली. गुजरात, पंजाब, दिल्ली आणि हरयाणा इथल्या पाच शाळांमध्ये आर्यनने आपली प्रयोगशाळा स्थापन केली. यामुळे इथल्या मुलांना अंतराळ संशोधनाची गोडी लागली. या उपक्रमाची दखल केंद्र सरकारनेही घेतली. केंद्रीय विद्यालयांमध्ये या प्रयोगशाळा स्थापन करता येतील का, याबाबत सरकारी अधिकाऱ्यांनी त्याच्याशी चर्चा केली. सूर्यमाला, ग्रह, तारे यांचे काही फोटो पुस्तकात असले तरी मुलांना प्रत्यक्ष अनुभूती घेता आली नव्हती. हीच परिस्थिती बदलावी, असं आर्यनला वाटतं. प्रयोगशाळांच्या माध्यमातून तो नवे खगोल शास्त्रज्ञ घडवतो आहे. त्याला ५०० प्रयोगशाळा सुरू करायच्या आहेत. त्याच्या प्रयत्नांमुळे देशाला नवे खगोल शास्त्रज्ञ मिळतील, अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

**सोशल मीडिया**

## रेकॉर्ड करा व्हॉट्स ॲप कॉल




आपल्याला व्हॉट्स ॲपवरील कॉल रेकॉर्ड करण्याची गरज भासते. पण हा कॉल कसा रेकॉर्ड करायचा हे कळत नाही. पण व्हॉट्स ॲप कॉलही रेकॉर्ड होऊ शकतो. यासाठी क्यूब कॉल रेकॉर्डर हे ॲप डाउनलोड करा. यानंतर व्हॉट्स ॲप कॉल करा. कॉल सुरू झाल्यानंतर हे ॲप बॅकग्राउंडमध्ये कॉल रेकॉर्डिंग सुरू करेल. कॉल बंद झाल्यानंतर रेकॉर्डिंगही बंद होईल. रेकॉर्ड झालेला कॉल ॲपच्या नोटिफिकेशन बारमध्ये दिसेल. अशा पद्धतीने तुम्ही कामासाठी व्हॉट्स ॲप कॉल करून तो रेकॉर्ड करू शकता.

# विक्री हस्तकलेच्या वस्तूंची

**स्वयंरोजगार**

सध्या हस्तकलेच्या वस्तूंना बरीच मागणी आहे. गृह सजावटीच्या या वस्तू अनेकांना आकर्षित करतात. तुमच्या अंगी अशा वस्तू बनवण्याची कला असेल किंवा हस्तकलेच्या वस्तूंच्या विक्रीचा व्यवसाय सुरू करायचा असेल तर तुम्हाला चांगली संधी मिळू शकते. या वस्तू वेबसाईट्सच्या माध्यमातून विकल्या जातात. यासाठी स्वत:ची वेबसाईट तयार करता येईल किंवा ई कॉमर्स वेबसाईट्सवरून या वस्तूंची विक्री करता येईल. हस्तकलेच्या अनोख्या किंवा ॲंटिक वस्तू विकण्याचा व्यवसाय करायच्या विचारात असाल तर या टिप्स उपयोगी पडतील.



- आपल्याकडच्या वस्तू वेगळ्या किंवा ॲंटिक असतील याची खात्री करून मगच त्या विक्रीसाठी उपलब्ध करा. लोकांना काहीतरी वेगळं, हटके हवं असतं. त्यामुळे अशाच वस्तू विका. तसंच झोकून देऊन काम करा.
- आपल्याकडच्या उत्पादनांचे प्रभावी फोटो पोस्ट करा. तसंच या उत्पादनांची माहिती अनोख्या पद्धतीने मांडा.
- सुरूवातीला ठराविक उत्पादनांचीच विक्री करा. वस्तूंची संख्या हळूहळू वाढवा. हस्तकलेच्या वस्तूंचा दर्जा टिकवून ठेवणं गरजेचं आहे. उत्तम आणि दर्जेदार वस्तूंची विक्री केली तरच तुम्ही ग्राहकांना जोडून घेऊ शकता.

**गॅझेट वर्ल्ड**

## पाणी कमी पिताय?

सध्या विविध प्रकारची गॅझेट्स लोकप्रिय झाली आहेत. काही गॅझेट्स ॲप्सच्या मदतीने तुमच्या आरोग्याची काळजी घेतात. तर असंच एक गॅझेट म्हणजे हायट्रेस स्पार्क २. ही एक बाटली आहे. पाणी पिण्याचं महत्त्व तर आपण जाणतोच. ही बाटली ॲपशी कनेक्ट होऊ शकते आणि तुम्ही दिवसभरात किती पाणी प्यायलात याचा हिशेबही ठेवते. म्हणूनच ही बाटली तुमच्याकडे असायला हवी.



**सोशल अवेअरनेस**

## फोन स्वच्छ करताय?

आपल्या स्मार्टफोनच्या स्क्रीनवर अनेक रोगजंतू असू शकतात. कोरोनाकाळानंतर अनेक जण सॅनिटायझरने फोनचा स्क्रीन स्वच्छ करतात. मात्र अशा पद्धतीने फोनचा स्क्रीन स्वच्छ करताना काळजी घ्यायला हवी. अन्यथा तुमचा फोन खराबही होऊ शकतो. स्मार्टफोना स्क्रीन अत्यंत नाजूक अशा घटकांपासून तयार करण्यात आलेला असल्यामुळे अल्कोहोलयुक्त सॅनिटायझरमुळे त्यावरील कोटींग निघू शकतं. याच कोटींगमुळे फोनच्या स्क्रीनचा पाणी तसंच तेलापासून बचाव होता. यासोबतच स्मार्टफोनच्या जॅक्सनाही द्रव पदार्थांनी स्वच्छ करू नये. द्रवामुळे हे जॅक खराब होऊ शकतात.



# टेस्टी कॅप्सिकम पोटॅटो स्ट्राईप्स

**झटपट रेसिपी**


दोस्तांनो, एखाद्या संध्याकाळी चटपटीत पण वेगळा पदार्थ खावासा वाटला तर कॅप्सिकम पोटॅटो स्ट्राईप्स ही डिश बनवून बघा.

***साहित्य :** दोन बटाटे, एक लाल सिमला मिरची, आल्याचा छोटा तुकडा, थोडी कोथिंबिर, एक चमचा ऑलिव्ह ऑईल, अर्धा चमचा जीरं, हिंग, मीठ, पाव चमचा हळद, एक चमचा धने, एक चमचा बडिशेप, अर्धा चमचा लाल तिखट, अर्धा चमचा आमचूर पावडर, अर्धा चमचा गरम मसाला.*

**कृती :** बटाटे सोलून लांब काप करून घ्या. लाल सिमला मिरचीचीही लांब कापून घ्या. आल्याचे छोटे तुकडे करा. एका कढईत ऑलिव्ह ऑईल गरम करून त्यात जीरं घाला. मग हिंग आणि हळद घाला. आल्याचे तुकडे घालून परता. धने आणि बडिशेप कुटून घ्या. आता यात बटाटा आणि सिमला मिरचीचे काप घाला. थोडे शिजू द्या. मग सगळे मसाले आणि मीठ घाला. परतून घ्या. शिजल्यावर वरून कोथिंबिर घाला. मस्तपैकी कॅप्सिकम पोटॅटो स्ट्राईप्स खा.



# प्रेम का उच्चशिक्षण?



**मॅच मेकिंग**

माझं एका मुलीवर प्रेम होतं. आमचं तीन वर्षांचं नातं संपलं. पण तिच्याशिवाय मला करमत नव्हतं. मन रमत नव्हतं. तिची खूप आठवण यायची. म्हणून हे नातं पुन्हा जोडण्यासाठी प्रयत्न सुरू केले. तिला संपर्क करत राहिलो. पण तिने. प्रतिसाद दिला नाही. तिच्या बहिणीची मदत घ्यायचं ठरवलं. पण या आघाडीवरही निराशाच हाती आली. मैत्रिणीच्या बहिणीने माझा अपमान केला आणि तिच्या आयुष्यातून निघून जायला सांगितलं. या मुलीकडून काहीच प्रतिसाद मिळाला नाही. माझे वडील आजारी असतानाही तिने संपर्क केला नाही. पण तिच्यावर खूप प्रेम असल्यामुळे हा दुरावा सहन होत नाही. जर्मनीत एमबीएची संधी चालून आली आहे. पण मधल्या काळात या मुलीचं लग्न होऊ शकतं. मग तिला कायमचं गमावून बसेन. काय करू?

उत्तर : मित्रा, तीन वर्षं जपलेलं नातं संपवून नव्याने आयुष्य सुरू करणं खूप कठीण आहे. पण आयुष्यात काही कठोर निर्णय घ्यावेच लागतात. स्वत:च्या भवितव्याचा विचार करावा लागतो. जर्मनीत एमबीए करण्याची संधी सगळ्यांना मिळत नाही. त्यामुळे ही संधी सोडू नकोस. शिक्षणामुळे तुझं भवितव्य घडणार आहे. त्यातच या मुलीकडून तुला कोणताही प्रतिसाद मिळत नसताना तिच्यासाठी आयुष्यभराची संधी सोडण्यात अर्थ नाही. एखाद्या व्यक्तीसोबत आयुष्य घालवणं यालाच प्रेम म्हणत नाहीत. प्रेम ही भावना खूप उदात्त आहे. प्रिय व्यक्तीच्या आनंदात आनंद मानणं हे सुद्धा प्रेमच आहे. त्यामुळे जर्मनीला जाण्याचा निर्णय घे. हेच तुझ्यासाठी योग्य आहे. योग्य वेळी योग्य व्यक्ती तुझ्या आयुष्यात येईल.

# निवड पर्यावरणपूरक कपड्यांची

**फॅशन पॅशन**

वस्त्रोद्योगामुळे बरंच प्रदूषण होतं. पर्यावरणाची हानी होते. आता आपल्या कपाटातली एक जीन्स तयार करण्यासाठी काही लीटर पाणी वापरलं जातं. जीनचं कापड धुण्यासाठी १० ते १५ लीटर पाणी लागतं. जीनची पँट किंवा जॅकेट तयार करण्याच्या प्रक्रियेत जवळपास पाच हजार लीटर पाण्याचा वापर होतो. वस्त्रोद्योग पर्यावरणपूरक व्हावा, यासाठी प्रयत्न होत असले तरी ते अपुरेच आहेत. म्हणूनच ग्राहकांनीही थोडे प्रयत्न करायला हवेत. आपलं कपड्यांचं कपाट पर्यावरणपूरक असावं, यासाठी काय करता येईल हे जाणून घेऊ.



- तुमच्याकडे कपड्यांच्या जास्त जोड्या असायला हव्यात. त्यातही जीन्सची संख्या अधिक असणं गरजेचं आहे. वर्षभरात तीन ते चार जोड्या कपडे वापरण्याऐवजी आठ ते नऊ जोड्या खरेदी करा. त्यातही जीन्स अधिक प्रमाणात खरेदी करा. जास्त कपडे अधिक काळ टिकतात. तसंच कमी वेळा धुतले जातात. शिवाय धुतलेले कपडे पुन्हा धुण्याआधी दोनदा वापरता आले तर उत्तम.
- जीन्स वारंवार धुवू नका. जीन्स नऊ ते दहा आठवडे न धुता वापरता येईल. वापरलेली जीन्स काही काळ उन्हात ठेवा. यामुळे जीन्सला वास येणार नाही.
- जीन्सची नीट देखभाल करावी लागते. जीन्स उसवली असेल तर ती लगेच शिवून घ्यायला हवी. एखाद्या चांगल्या बुटिकमध्ये जाऊन जीन्सची डागडुजी करता येईल. यामुळे तुमची जीन्स बराच काळपर्यंत टिकून राहिल.
- रस्त्यावर स्वस्तात मिळणारे कपडे अजिबात विकत घेऊ नका. या कपड्यांचा दर्जा फार चांगला नसतो. त्यामुळे हे कपडे लवकर खराब होतात आणि कचऱ्याच्या डब्यात जातात. यामुळे कचऱ्यात भरच पडते.
- कपडा उत्पादक कंपन्या शाश्वत जीवनशैलीचा अवलंब करतात. याबाबतची माहिती कपड्यावर लावण्यात आलेल्या लेबलवर लिहिलेली असते. त्यामुळे ही लेबल्स वाचून मगच कपडे खरेदी करा.




# सफर कुद्रेमुख राष्ट्रीय उद्यानाची

**थंडीच्या दिवसात भटकंती करणं हा धमाल अनुभव असतो. बोचरे वारे, हुडहुडी भरवणारी थंडी फिरण्याचा आनंद द्विगुणीत करतात. थंडीच्या दिवसात फिरण्यासाठी योग्य ठिकाणाच्या शोधात असाल तर कुद्रेमुखची निवड करा. तुंग, भद्रा आणि नेत्रावती या दक्षिण भारतातल्या प्रमुख नद्या. या नद्यांचं उगमस्थान कुद्रेमुखमध्ये आहे. कुद्रेमुखचं राष्ट्रीय उद्यान अनेक अर्थांनी अनोखं आहे. या परिसरात ट्रेकिंगही करता येतं. पावसाळ्यात आणि हिवाळ्यात इथे मस्त भटकंती करता येते.**

**भटकंती**

कुद्रेमुख म्हणजे घोड्यासारखं मुख. कुद्रेमुख परिसरातल्या डोंगररांगांमध्ये घोड्याचा तोंडाचा भास होत असल्यामुळे या भागाला कुद्रेमुख हे नाव पडलं. या डोंगरांमधल्या गुहेत देवी भगवतीचं मंदिरही आहे. कुद्रेमुख राष्ट्रीय उद्यानात वाघ, बिबट्या, हत्ती, हरणं, माकडं तसंच इतर काही प्रजातींचे प्राणी आणि पक्षी पहायला मिळतात. वन्यजीवनाच्या छायाचित्रणाची आवड असेल तर कुद्रेमुखसारखं उत्तम ठिकाण नाही. कुद्रेमुख राष्ट्रीय उद्यानाच्या आसपासच्या गावांमध्ये होम स्टेची सुविधा आहे. या होम स्टे दरम्यान तुम्ही इथल्या स्थानिक संस्कृतीची ओळख करून घेऊ शकता.

इथे १८ किलोमीटरचा ट्रेक आहे. हा ट्रेक पूर्ण करून संध्याकाळी घरी येता येईल. होम स्टे दरम्यान अस्सल कानडी भोजनाचा आस्वादही घेता येईल. या दरम्यान तुम्ही गाईडही घेऊ शकता. बंगळूरू किंवा मंगळूरहून कुद्रेमुखला जाता येईल. मग कुद्रेमुख राष्ट्रीय उद्यानाला नक्की भेट द्या.



## At a Glance

### परराष्ट्र सचिव २६ पासून चीन दौऱ्यावर

**नवी दिल्ली :** परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री रविवारपासून दोन दिवसांच्या बीजिंग दौऱ्यावर जाणार आहेत. परराष्ट्र सचिव - उपमंत्री यंत्रणेच्या बैठकीसाठी मिस्री चीनच्या दौऱ्यावर आहेत, अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाने गुरुवारी दिली. राजकीय, आर्थिक आणि लोकांमधील क्षेत्रांसह भारत-चीन संबंधांवर चर्चा करण्यासाठी नेतृत्व स्तरावर झालेल्या करारातून ही द्विपक्षीय यंत्रणा पुन्हा सुरू होण्याची शक्यता आहे.

### सर्वसमावेशक विकास हा प्रमुख आधारस्तंभ

**दावोस :** आगामी काळात महागाई आटोक्यात ठेवत भारत ६ ते ८ टक्के आर्थिक विकासदर कायम ठेवेल, असा विश्वास ज्येष्ठ केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी गुरुवारी व्यक्त केला. जागतिक आर्थिक मंचाच्या वार्षिक बैठकीदरम्यान एका सत्रात बोलताना ते म्हणाले की, सर्वसमावेशक विकास हा देशाच्या आर्थिक आराखड्याचा एक प्रमुख स्तंभ आहे.

### डॉलरच्या वाढीमुळे रुपयाची घसरण

**दावोस :** भारतीय रुपयाच्या घसरणीला केवळ अमेरिकी डॉलर मजबूत होण्याला जबाबदार धरत रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांनी रिझर्व्ह बँकेने यावर हस्तक्षेप केल्यास भारतीय निर्यातीचे नुकसान होऊ शकते, असे मत व्यक्त केले आहे. ट्रम्प कार्यकाळाचा जागतिक आणि भारतीय अर्थव्यवस्थेसाठी काय अर्थ आहे, असे विचारले असता राजन म्हणाले, मला वाटते याचा अर्थ अनिश्चितता आहे.

# जयशंकर यांना मानाचे पान

## ट्रम्प शपथविधी सोहळा संबंधांत सुधारणा होण्याची आशा व्यक्त

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** डोनाल्ड ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेतली, तेव्हा तेथे भारताला सन्माननीय स्थान देण्यात आले होते. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांना पहिल्या रांगेत बसवण्यात आले होते. याबाबत जयशंकर यांना विचारणा केली असता, ते हसले आणि म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विशेष दूताचा साहजिकच खूप चांगल्या पद्धतीने सन्मान केला जातो.

अमेरिकी सरकारच्या निमंत्रणावरून शपथविधी सोहळ्यात भारताचे प्रतिनिधित्व करणारे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे पत्र अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडे सुपूर्द केले. भारत-अमेरिका संबंध मजबूत करण्याच्या ट्रम्प प्रशासनाच्या तयारीचे हे पाऊल असल्याचे त्यांनी म्हटले आहे. एक गोष्ट स्पष्ट होती की, शपथविधी सोहळ्यात भारताचा समावेश करण्यासाठी ट्रम्प प्रशासन उत्सुक होते. ते द्विपक्षीय संबंधांना प्राधान्य देत आहेत.

जयशंकर यांनी त्यांच्या तीन दिवसांच्या वॉशिंग्टन दौऱ्यात उच्चस्तरीय बैठकांमध्ये भाग घेतला. त्यांनी अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार माइक वॉल्ट्झ यांच्याशी द्विपक्षीय चर्चाही केली. याव्यतिरिक्त, त्यांनी नवीन ट्रम्प प्रशासनाच्या अंतर्गत पहिल्या चतुर्भुज मंत्रिस्तरीय बैठकीत देखील भाग घेतला, ज्यामध्ये ऑस्ट्रेलिया, जपान आणि अमेरिकेतील त्यांच्या समकक्षांनी देखील भाग घेतला.

जयशंकर म्हणाले, भारत-अमेरिका संबंध पुढे नेण्यासाठी दोन्ही बाजूंनी स्पष्टपणे तीव्र इच्छा आहे. पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यात फोनवर चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले.

ट्रम्प प्रशासनाच्या पहिल्या कार्यकाळात उभारण्यात आलेल्या पायाभूत सुविधांवर काम करण्यास दोन्ही देश तयार आहेत, असेही जयशंकर म्हणाले. सध्या भारत आणि अमेरिका यांच्यात विश्वास आणि हितसंबंधांचे खूप मजबूत अभिसरण आहे. मोदी सरकार आणि ट्रम्प प्रशासन हे दोघेही आपल्या राष्ट्रीय हिताच्या आणि आत्मविश्वासाने जगाकडे पाहत आहेत.

जयशंकर यांनी अमेरिकेच्या व्हिसा प्रक्रियेतील दिरंगाईच्या मुद्द्यालाही हात घातला. शेवटी या व्हिसा विलंबामुळे व्यापारावर परिणाम होतो, पर्यटनावर परिणाम होतो आणि लोकांमधील संपर्क मर्यादित होतो, असे ते म्हणाले. ते म्हणाले की, दोन्ही बाजूंनी त्यांच्या परस्पर विश्वासाचे खऱ्या भागीदारीत रूपांतर करण्याची गरज आहे. आपल्याला धाडसी व्हायला हवं, मोठा विचार करायला हवा आणि अधिक महत्त्वाकांक्षी व्हायला हवं, असं ते म्हणाले.

### मोदी-ट्रम्प यांची फेब्रुवारीत भेट?

● डोनाल्ड ट्रम्प यांच्या शपथविधी सोहळ्यात परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर पहिल्या रांगेत बसले होते. त्यानंतर एस. जयशंकर हे क्वाडच्या बैठकीत प्रमुख भूमिकेत दिसले. दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांच्या पुनरागमनामुळे यंदा अमेरिका आणि भारत यांच्यातील संबंधांचा नवा अध्याय लिहिण्याचे प्रयत्न सुरू झाल्याची माहिती आहे. डोनाल्ड ट्रम्प आणि नरेंद्र मोदी यांच्यात फेब्रुवारीमध्येच बैठक व्हावी, यासाठी अमेरिका आणि भारताचे मुत्सद्दी प्रयत्नशील असल्याचे वृत्त आहे. या दोन्ही नेत्यांची शेवटची भेट २०२० मध्ये झाली होती आणि त्यानंतर डोनाल्ड ट्रम्प सत्तेतून बाहेर पडले होते. आता ट्रम्प पुन्हा एकदा परतले आहेत, त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी असलेल्या त्यांच्या संबंधांचा फायदा भारताला घ्यायचा आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, डोनाल्ड ट्रम्प आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात फेब्रुवारीमध्ये द्विपक्षीय चर्चा होऊ शकते. फ्रान्समध्ये १० आणि ११ फेब्रुवारी ला आर्टिफिशियल इंटेलिजन्स समिट आहे. त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी येत असून डोनाल्ड ट्रम्पही आले तर दोन्ही नेत्यांची भेट होणार आहे. ट्रम्प येथे आले नाहीत तर पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकेचा दौरा करू शकतात. हा कालावधी फेब्रुवारीच्या मध्यात कोणत्याही तारखेला होऊ शकतो. इतकंच नाही तर हे दोन्ही नेते एका सार्वजनिक कार्यक्रमालाही उपस्थित राहू शकतात, अशी चर्चा आहे. २०१९ मध्ये नरेंद्र मोदी अमेरिकेत पोहोचले तेव्हा ५० हजार भारतीयांच्या उपस्थितीत हाउडी मोदीचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात डोनाल्ड ट्रम्प आणि मोदी एकत्र आले आणि त्यात बहुतांश भारतीय-अमेरिकन आले. यानंतर डोनाल्ड ट्रम्प स्वत: फेब्रुवारी २०२० मध्ये भारतात आले होते.

क्वाड शिखर परिषदही यावर्षी भारतात होणार आहे. यात चारही देशांच्या राष्ट्रप्रमुखांचा समावेश असेल, त्यापैकी एक डोनाल्ड ट्रम्प असतील. त्यामुळे हे वर्ष भारत आणि अमेरिका यांच्यातील चांगल्या संबंधांचे वर्ष ठरणार आहे. फेब्रुवारीमध्ये मोदी आणि ट्रम्प यांची भेट होणार असून त्यानंतर क्वाड शिखर परिषदेत बैठक होणार आहे. अमेरिका हा भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे. २०२३-२४ मध्ये दोन्ही देशांमधील व्यापार ११८ अब्ज डॉलर होता. भारताकडेही ३२ अब्ज डॉलरचा अनुशेष आहे. अशा वेळी अमेरिकेबरोबरच्या व्यापारी संबंधांना विशेष महत्त्व आहे.

# बाळासाहेब ठाकरे यांना भारतरत्न द्या

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची गुरुवारी जयंती असून, या निमित्ताने ठाकरे गटाने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. उद्धव ठाकरे यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना अंधेरी येथील मेळाव्यात मार्गदर्शन केले. ठाकरे गटाची अस्मिता मानली जाणाऱ्या बृहन्मुंबई महापालिका आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता तोंडावर असल्याने हा मेळावा महत्त्वाचा मानला जातो. आता ठाकरे गटाच्या सर्व खासदारांनी बाळासाहेब ठाकरे यांना भारतरत्न द्यावा, अशी पत्रकार परिषदेद्वारे अधिकृत मागणी केली असून, ट्विट करत अभिवादन करण्यापेक्षा बाळासाहेबांना भारतरत्न द्या, असे खासदार संजय राऊत यांनी म्हटलंय.

पत्रकार परिषदेत खासदार संजय राऊत म्हणाले की, "ही पत्रकार परिषद घेण्यासाठी आम्हाला उद्धव ठाकरेंनी पाठवलंय. आज हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती आहे. आज बाळासाहेब आपल्यात नाहीत. पण या महाराष्ट्राच्या कणाकणात बाळासाहेब आपल्याला पाहायला मिळतात. आपण आज जो महाराष्ट्राचा स्वाभिमान, महाराष्ट्राची अस्मिता म्हणतो, हा स्वाभिमान बाळासाहेबांमुळेच शिल्लक आहे. याच कारणास्तव त्यांना मराठी मनाचे मानबिंदू असं म्हटलं जातं. बाळासाहेब हयात असताना जी लोक त्यांना भेटलीत, त्यांच्या संपर्कात आलीत, ते लोक खरंच भाग्यवान आहेत. आम्ही त्यांच्यासोबत अनेक वर्ष आहोत. त्यामुळे आम्हीदेखील स्वतःला भाग्यवान समजतो. आज बाळासाहेब आपल्यात नसले तरी त्यांच्या विचारांनी आम्ही कायम त्यांना आमच्यासोबत ठेवलंय," असंही संजय राऊतांनी सांगितलंय.

# आयफोन आणि अँड्रॉईडसाठी ओला-उबेरला वेगवेगळे दर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणने कॅब सेवा पुरवठादार ओला आणि उबेर यांना त्यांच्या भाड्यातील कथित तफावतबद्दल नोटीस बजावली आहे. आयफोन आणि अँड्रॉइड सारखे वेगवेगळे स्मार्टफोन वापरताना त्यांना एकाच भाड्यासाठी वेगवेगळे भाडे दाखवले जात असल्याचा आरोप करणाऱ्या ग्राहकांच्या तक्रारीनंतर ही कारवाई करण्यात आली आहे. केंद्रीय ग्राहक व्यवहारमंत्री प्रल्हाद जोशी यांनी याबाबत माहिती दिली.

केंद्रीय मंत्र्यांनी सोशल मीडियावर सांगितले की, ग्राहक व्यवहार विभागाने या समस्येची दखल घेतली असून सीसीपीएला चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत. काही फोन मॉडेल्सवर भाडे जास्त दाखवले जाते तर काहींवर कमी भाडे दाखवले जाते, असे तक्रारदारांनी सांगितले. ओला आणि उबेरला आता त्यांची भाडे निश्चित करण्याची प्रक्रिया आणि या फरकांची कारणे स्पष्ट करण्यास सांगितले आहे.

# शिक्षणाधिकाऱ्याच्या घरी छापेमारी

## बेहिशेबी रोकड मोजण्यासाठी मागवली मशीन बिहारमधील घटना

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पाटणा :** बिहारमध्ये, बिहार दक्षता पथक सकाळपासून जिल्हा शिक्षण अधिकारी रजनीकांत प्रवीण यांच्या निवासस्थानासह अनेक ठिकाणी छापे टाकत आहे. त्याच्या दरभंगा, मधुबनी, बेतिया आणि समस्तीपूर येथील घरासह इतर ठिकाणी दक्षतेच्या चार पथकांनी छापे टाकले आहेत.

समस्तीपूरमध्येही छापे टाकले जात आहेत. खरं तर, रजनीकांत प्रवीण यांचे सासरचे लोक समस्तीपूरमध्ये राहतात. बिहार स्पेशल सर्व्हेलन्स युनिटचे एडीजी पंकज कुमार दराड यांच्या सूचनेनुसार हा छापा टाकण्यात आला आहे. त्यांच्या गुप्त ठिकाणांमधून कोट्यवधी रुपये रोख जप्त करण्यात आले आहेत. ही रक्कम इतकी मोठी आहे की ती मोजण्यासाठी एक मशीन मागवण्यात आली आहे. आता शिक्षण विभागातील अनेक अधिकारीही दक्षतेच्या रडारवर आहेत.



रजनीकांत प्रवीण यांच्या विविध ठिकाणांमधून कोट्यवधी रुपयांच्या रोख रकमेसह, जंगम आणि स्थावर मालमत्तेचे कागदपत्रे देखील जप्त करण्यात आली आहेत. कोणालाही घरात प्रवेश करण्याची किंवा आतून बाहेर येण्याची परवानगी नाही. गेल्या अनेक तासांपासून दक्षता पथक त्याच्या घरी उपस्थित आहे. जिल्हा शिक्षण अधिकारी रजनीकांत प्रवीण हे गेल्या ३ वर्षांपासून बेतिया येथे तैनात आहेत. त्यांच्या कार्यालयातही हा छापा सुरू आहे.

रजनीकांत प्रवीण हे पश्चिम चंपारणचे जिल्हा शिक्षण अधिकारी आहेत. दक्षता पथक त्यांच्या तीनपेक्षा जास्त ठिकाणी छापे टाकत आहे. बेहिशेबी मालमत्तेच्या प्रकरणात त्याच्याविरुद्ध ही कारवाई करण्यात येत आहे. शिक्षक संघटनांनी त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोपही केले होते. रजनीकांत प्रवीण यांच्या सर्व ठिकाणांमधून आतापर्यंत १.८७ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीची मालमत्ता उघडकीस आली आहे. त्याच्यावर सुमारे ३ कोटी रुपयांची मालमत्ता असल्याचा आरोप आहे.

रजनी कांत प्रवीण हे बिहार राज्य शिक्षण विभागाचे ४५ व्या बॅचचे अधिकारी आहेत. त्यांनी २००५ मध्ये सेवा सुरू केली. ते सुमारे १९-२० वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. पण छाप्यादरम्यान त्याच्या घरातून कोट्यवधी रुपये जप्त करण्यात आले. त्यांची पत्नी एक शाळा चालवते. आरोपींचे म्हणणे आहे की, त्यांची पत्नी त्याचे बेकायदेशीर पैसे गुंतवून शाळा चालवते.

# मणिपूर सरकारला जेडीयूचा पाठिंबा कायम

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** मणिपूरमध्ये भाजप आणि जनता दल (संयुक्त) यांच्यातील अंतर वाढले आहे. जदयूच्या राज्य कार्यकारणीने राज्य सरकारचा पाठिंबा काढून घेण्याची घोषणा केली. त्यांनी राज्यपाल अजय कुमार भल्ला, मुख्यमंत्री आणि विधानसभा अध्यक्ष यांना पाठिंबा काढून घेण्याचे पत्र पाठवले. मात्र, हा पाठिंबा काढून घेतल्याचा मणिपूर सरकारवर कोणताही परिणाम होणार नाही. जदयूचे नेते आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी तत्काळ कारवाई करत प्रदेशाध्यक्ष के. बिरेन सिंग यांना त्यांच्या पदावरून हटवले. तसेच मणिपूर सरकारला जनता दल ( संयुक्त) चा पाठींबा कायम असल्याचे स्पष्ट केले आहे.

# छोट्या राजनच्या डीके रावला खंडणीप्रकरणी अटक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** खंडणी विरोधी पथकानं कुख्यात गँगस्टर डी के राव याला बेड्या ठोकल्या आहेत. डी के राव आणि त्याच्या ६ हस्तकांनी अडीच कोटी रुपयांची खंडणी मागितल्याची तक्रार एका हॉटेल व्यावसायिकाने मुंबई पोलिसांच्या क्राईम ब्रँच आणि खंडणी विरोधी पथकाकडे दाखल केली होती. या प्रकरणी मुंबई पोलिसांच्या खंडणी विरोधी पथकानं डी के राव याच्यासह त्याच्या सहा हस्तकांविरोधात गुन्हा दाखल केला. पोलिसांनी आता डी के राव आणि त्याच्या सहा हस्तकांना बेड्या ठोकल्या आहेत. पुढील तपास मुंबई गुन्हे शाखेचं पथक करत आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.



मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेतील खंडणी विरोध पथकाला मिळालेल्या तक्रारीनुसार एका हॉटेल व्यावसायिकाला अडीच कोटी रुपयाची खंडणी मागण्यात आली. या प्रकरणी या हॉटेल व्यावसायिकानं खंडणी विरोधी पथकाकडं तक्रार दाखल केली. खंडणी विरोधी पथकानं केलेल्या चौकशीत डी के रावनं एका हॉटेल व्यवसायिकाकडून खंडणी म्हणून अडीच कोटी रुपये मागितल्याचं आणि खंडणी दिली नाही, तर हत्या करण्याची धमकी दिल्याचं समोर आलं. याप्रकरणी पोलिसांनी तपास करुन डी के राव विरोधात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमानुसार गुन्हा नोंदवण्यात आला. डी के राव आणि त्याचे सहा साथीदार अशा एकूण सात जणांना अटक करण्यात आली असून, याबाबत पुढील तपास सुरू असल्याची माहिती मुंबई पोलिसांनी दिली

# विवाहित पुरुषही ठरतात क्रूरतेचे बळी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**बेंगळुरू :** घटनात्मकदृष्ट्या महिलांना पुरूषांइतकेच अधिकार आहेत. वैवाहिक वाद आणि मतभेद प्रकरणात महिलाच छळ आणि क्रूरतेला सर्वाधिक बळी पडतात हे खरं आहे;पण वैवाहिक वादात पुरुषही महिलांकडून होणाऱ्या क्रूरतेचे बळी ठरतात, ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच आज लिंगनिरपेक्ष समाजाची गरज आहे, असे निरीक्षण नुकतेच कनार्टक उच्च न्यायालयाने नोंदवले. तसेच घटस्फोट प्रकरणाचा खटला हस्तांतरित करण्याची पत्नीची मागणीही न्यायालयाने फेटाळली.

दाम्पत्याला दोन मुलं आहेत. मागील काही दिवसांपासून पती-पत्नी विभक्त राहत आहेत. दोन्ही मुलांचा संभाळ पती करत आहे. घटस्फोटाच्या खटल्याची सुनावणी सध्या चिकमंगलूर न्यायालयात सुरु आहे. आपण चिकमंगलूरपासून १३० किलोमीटर अंतरावर राहण्यास आहे. खटल्याच्या सुनावणीसाठी दरवेळी तिथे जाणे कठीण आहे. त्यामुळे खटला शिवमोगा जिल्ह्यातील न्यायालयात हस्तांतरित करावा, अशी मागणी करणारी याचिका पत्नीने कर्नाटक उच्च न्यायालयात दाखल केली होती. पत्नीने दाखल केलेल्या याचिकेवर ७ जानेवारी रोजी कर्नाटक उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती सी. सुमलता यांच्या एकल खंडपीठासमोर झाली. यावेळी न्यायालयाने खटला हस्तांतरित करण्याची मागणी फेटाळली.

## हिमवर्षाव

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**अटलांटा** अटलांटा, जॉर्जियामध्ये सर्वत्र बर्फवृष्टी होत असून, रस्त्यावर असा बर्फाचा ढिग जमला आहे.

# बांगलादेशी दहशतवाद्याला धुबरी येथून अटक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**दिसपुर :** इस्लामिक कट्टरवादी असलेल्या बांगलादेशातील दहशतवाद्यांना आसाम पोलिसांच्या स्पेशल टास्क फोर्सने बांगलादेशास लागून असलेल्या धुबरी जिल्ह्यातून ताब्यात घेतले आहे. या अटकेमुळे एकूण अटकेची संख्या आता १४ वर गेली आहे. याप्रकरणात पोलिसांनी आणखी एकाला अटक केली असल्याची माहिती मंगळवारी दिली. ताब्यात घेतलेल्या दहशतवाद्याचे नाव हे अजिबर रहमान असून वय वर्षे ३१ आहे. ही अटक दि. १९ जानेवारी रोजी घडली होती.

संबंधित दहशतवादी हा धुबरी जिल्ह्यातील बिलासीपारा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चिनामारी ग्रामीण भागातील रहिवासी होता. अल-कायदा या बांगलादेशस्थित कट्टरपंथी इस्लामिक संघटनेशी संबंधित असलेल्या अन्सुल्ला बांगला पथकाच्या आरोपीस पोलिसांच्या स्पेशल टास्क फोर्सने अटक केली होती.

सीपीआरओने जापी केलेल्या निवेदनामध्ये सांगितले की, अटक करण्यात आलेल्या आरोपीच्या कारवाया देशाच्या सुरक्षेसाठी आणि सार्वभौमत्वाला ठेच पोहोचवणारी आहे. दरम्यान अटक करण्यात आलेला रहमान हा चिनामारी जिल्ह्यातील १४ वा अटक करण्यात आलेला आरोपी आहे. अन्सारुल्लाह बांगलाने आपले दहशतवादी भारतात पाठवले होते ज्यांना या संबंधित दहशतवादी पथकात नवीन भरती करायची होती.

# राज्यातील हवामानातील चढ-उतार कायम

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**हवामान**

**मुंबई :** राज्यातील हवामानात सध्या चढ-उतार होत आहे. राज्यातील विविध भागांमध्ये तापमानात लक्षणीय बदल होत असून, याचा परिणाम विविध जिल्ह्यांवर होताना दिसत आहे. राज्यातील बहुतांश भागांमध्ये दुपारच्या वेळी तापमानात वाढ होत असतानाच दुसरीकडे रात्री आणि पहाटेच्या वेळी मात्र गारठा वाढत असल्याने राज्यातून अद्यापही थंडीने काढता पाय घेतलेला नाही हे दिसून येत आहे.

सातत्यानं सक्रिय असणाऱ्या पश्चिमी वाऱ्यांमुळे राज्यात पुन्हा एकदा थंडी काहीशी सक्रिय होताना दिसत आहे. असं असलं तरीही तापमानातील चढ- उतार मात्र कायम असल्याचं पाहायला मिळतंय. पश्चिम महाराष्ट्रासह उत्तर महाराष्ट्रामध्येही धुक्याची चादर पाहायला मिळत आहे. तर, विदर्भात काही अंशी पहाटेच्या वेळी बोचरी थंडी जाणवत असून उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भात शुक्रवारनंतर (२४ जानेवारी) तापमानवाढीस सुरुवात होणार आहे. ज्यामुळे पुन्हा एकदा उष्मा वाढणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. मुंबई शहर, उपनगर, औरंगाबाद, पुणे इथं किमान तापमान १४ ते १७ अंशांदरम्यान असलं तरीही कमाल तापमानाचा आकडा सरासरी ३४ अंशांदरम्यान असल्याचं म्हटलं जात आहे.

# डॉलरला हद्दपार करण्यासाठी भारताचा पुढाकार

**अर्थ**

**एकीकडे चीनला ब्रिक्स व्यासपीठाचा वापर करून अमेरिकेविरुद्ध आपली ताकद वाढवायची आहे, तर भारताचा समतोल राखण्यात विश्वास आहे. भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी ऑक्टोबर महिन्यात स्पष्ट केले होते की, भारत डॉलरच्या तुलनेत सक्रियपणे पावले उचलत नाही, परंतु आपल्या व्यापार हितांचे रक्षण करण्यासाठी पर्यायी व्यवस्था शोधत आहे.**

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जगातील आपली आर्थिक ताकद आणि मुत्सद्देगिरीच्या जोरावर भारत आता आंतरराष्ट्रीय व्यापारात डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. ब्रिक्स देशांमध्ये (ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका) आर्थिक सहकार्य बळकट करण्यासाठी भारताने घेतलेल्या पुढाकारामुळे जागतिक स्तरावर नव्या चर्चेला उधाण आले आहे.

२०२२ मध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने ऐतिहासिक पाऊल उचलत आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी भारतीय



रुपयात पेमेंट करण्याची परवानगी दिली. रशिया-युक्रेन युद्धादरम्यान रशियावर पाश्चिमात्य देशांनी घातलेल्या निर्बंधांनंतर हा निर्णय घेण्यात आला. डॉलरच्या वर्चस्वाला आव्हान न देता केवळ भारताचा व्यापार सुरक्षित करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले. तथापि, २०२४ मधील ब्रिक्स परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले होते की "स्थानिक चलनांमध्ये व्यापार आणि सीमापार पेमेंट सुलभ केल्याने ब्रिक्स देशांमधील आर्थिक सहकार्य मजबूत होईल."

एकीकडे चीनला ब्रिक्स व्यासपीठाचा वापर करून अमेरिकेविरुद्ध आपली ताकद वाढवायची आहे, तर भारताचा समतोल राखण्यात विश्वास आहे. भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी ऑक्टोबर महिन्यात स्पष्ट केले होते की, भारत डॉलरच्या तुलनेत सक्रियपणे पावले उचलत नाही, परंतु आपल्या व्यापार हितांचे रक्षण करण्यासाठी पर्यायी व्यवस्था शोधत आहे.

हे पाऊल डॉलर काढून टाकण्यासाठी नाही, तर भारतीय व्यवसायाला धोका कमी करण्यासाठी आहे, असे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी डिसेंबर महिन्यात स्पष्ट केले होते. ब्रिक्समध्ये चिनी युआनचा वाढता प्रभाव भारतासाठी आव्हानात्मक ठरू शकतो, याची भारताला जाणीव आहे. रशियात युआनचा वाढता वापर असूनही भारताने रशियाच्या तेल आयातीत युआनचा अवलंब करणे टाळले आहे. त्याऐवजी भारताने सोन्याचा साठा वाढवून आपल्या व्यापाराचे रक्षण करण्याचे धोरण अवलंबिले आहे.

ब्रिक्सच्या माध्यमातून डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी भारताने पुढाकार घ्यावा आणि हे पाऊल कोणत्याही एका देशाच्या बाजूने झुकणार नाही याची काळजी घ्यावी, असे तज्ज्ञांचे मत आहे.



"मला स्वत:बद्दल बोलायचे होते, पण मी कर्णधार (सूर्यकुमार यादव) आणि प्रशिक्षक (गंभीर) यांचा विशेष उल्लेख करू इच्छितो. त्यांनी आम्हाला युवा खेळाडू म्हणून दिलेले स्वातंत्र्य जबरदस्त आहे." विशेष म्हणजे बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीदरम्यान गंभीरचा वरिष्ठ खेळाडूंशी समन्वय नसल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. मात्र आता अभिषेक शर्माने ड्रेसिंग रूममधील वातावरणाचे कौतुक केले आहे. ज्यामुळे सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे. "ज्या प्रकारे युवा खेळाडूंशी बोलतात ते खूपच खास आहे. संघातील असे वातावरण मी याआधी कधीही पाहिले नव्हते. जेव्हा कर्णधार आणि प्रशिक्षक मोकळेपणाने खेळण्याची मुभा देतात, तेव्हा ते विशेष असते. ही दुहेरी विकेट होती. आमच्या गोलंदाजांनी चांगली गोलंदाजी केली. मला वाटले होते की आम्ही १६०-१७० धावांचा पाठलाग करण्याची संधी मिळेल, गोलंदाजांनी खरोखरच चांगली गोलंदाजी केली. इंग्लंडला १३२ धावांवर रोखण्यात यश आले."

— अभिषेक शर्मा

# भारताचा दणदणीत विजय

## अभिषेकची वादळी खेळी : वरूण चक्रवर्तीच्या फिरकीची कमाल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**कोलकता :** भारताच्या गोलंदाजांची भेदक गोलंदाजी आणि अभिषेक शर्माची वादळी फलंदाजीच्या जोरावर टीम इंडियाने पहिल्या टी-२० सामन्यात रोमहर्षक विजय मिळवला आहे. तिलक वर्माच्या विजयी चौकारासह भारताने इंग्लिश संघाचा ७ विकेट्सने पराभव केला. अभिषेक शर्माने ३४ चेंडूत ७९ धावांची विस्फोटक फलंदाजी करत भारताला सहज मिळवून देण्यात मोठी भूमिका बजावली. संजू सॅमसन आणि अभिषेक शर्माने इंग्लंडच्या एकापेक्षा एक उत्कृष्ट वेगवान गोलंदाजांची परिक्षा घेतली आणि त्यात भारताचे फलंदाज अव्वल गुणांनी पास झाले.

भारतीय संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, जो भारतीय संघाच्या गोलंदाजांनी पूर्णपणे योग्य असल्याचं सिद्ध केलं. इंग्लंडचा संघ २० षटकांत १३२ धावा करून सर्वबाद झाला. भारतीय संघाकडून गोलंदाजीत वरुण चक्रवर्तीने ३ तर अर्शदीप सिंग, हार्दिक पंड्या आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी २ विकेट घेतले.

भारताच्या टी-२० संघाने गोलंदाजी, क्षेत्ररक्षण आणि फलंदाजी तिन्ही क्षेत्रांमध्ये या सामन्यात उत्कृष्ट कामगिरी केली. अर्शदीप सिंगने पहिल्याच षटकातील तिसऱ्या चेंडूवर विकेट भारतीय संघाचे मनसुबे जाहीर केले. यानंतर जोस बटलरने एका टोकाकडून संघाचा डाव सावरला खरा पण त्याला कोणत्याच फलंदाजी चांगली साथ मिळाली नाही. बटलर आणि हॅरी ब्रुकने भागीदारी रचण्याचा प्रयत्न केला. पण वरूण चक्रवर्तीने एकाच षटकात क्लीन बोल्ड करत २ विकेट्स घेत इंग्लंडच्या पुनरागमनाचे दरवाजे बंद केले. अर्शदीप वरूणनंतर भारताच्या इतर गोलंदाजांनी झटपट विकेट घेण्यात हातभार लावला. जोस बटलरने ४४ चेंडूत ८ चौकार आणि २ षटकारांसह ६८ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. अशारितीने इंग्लंडच्या डावात भारताने पूर्णपणे आपला दबदबा कायम राखला.

टीम इंडियाच्या १३३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा ही सलामीची जोडी मैदानात आली. या दोघांनी पहिल्या विकेटसाठी ४१ धावांची झटपट भागीदारी पाहायला मिळाली. सॅमसन २६ धावा करून बाद झाला, तर अभिषेकने एका टोकाकडून डाव सांभाळून वेगवान धावा करत इंग्लंडला पुनरागमनाची कोणतीही संधी दिली नाही. अभिषेकच्या बॅटमधून ७९ धावांची शानदार खेळी पाहायला मिळाली, तर भारतीय संघाने हे लक्ष्य १२.५ षटकांत ३ गडी गमावून पूर्ण केले.

संजू सॅमसनने २० चेंडूत ४ चौकार आणि १ षटकारासह २६ धावा केल्या. तर अभिषेक शर्माने ३४ चेंडूत ५ चौकार आणि ८ षटकारांसह ७९ धावा केल्या. तर सूर्यकुमार यादव २ चेंडू खेळल्यानंतर खाते न उघडता बाद झाला. यानंतर तिलक वर्मोही १९ धावांची खेळी करत संघाच्या विजयात योगदान दिले. तर इंग्लंडच्या डावात भारताच्या खेळाडूंनी उत्कृष्ट क्षेत्ररक्षण केले.

## केकेआरचे २३.७५ कोटी पाण्यात जाणार?

**नवी दिल्ली :** इंडियन प्रीमियर लीग च्या २०२५ च्या पर्वासाठी फक्त दीड महिना बाकी असताना, कोलकाता नाईट रायडर्सला मोठा धक्का बसेल अशी बातमी समोर आली आहे. आयपीएल लिलावात २३.७५ कोटी रुपयांमध्ये संघात दाखल करून घेतलेला वेंकटेश अय्यरला रणजी करंडक स्पर्धेतील लढतीत दुखापतीमुळे रिटायर्ड हर्ट व्हावे लागले. त्याचा उजवा घोटा दुखावल्याने मध्य प्रदेश आणि केरळ यांच्यातल्या सुरू असलेल्या लढतीतून तो फलंदाजी सोडून तंबूत परतला.

केरळने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि मध्यप्रदेशला १८ षटकांत ४९ धावांवर ४ धक्के दिले. तेव्हा वेंकटेश अय्यर फलंदाजीसाठी आला, परंतु फक्त तीन चेंडू खेळला आणि त्याच्या घोट्याला दुखापत झाल्याने त्याला रिटायर हर्ट व्हावे लागले. त्याला प्रचंड वेदना होत होत्या आणि फिजिओ व काही राखीव खेळाडूंचा आधार घेत तो मैदानाबाहेर गेला. अय्यरची दुखापत गंभीर नसावी अशी आशा केकेआर करत असेल.

## स्केल-अप ॲकॅडमी, २२ यार्डस् संघांची विजयी कामगिरी





**पुणे :** पुणे क्रिकेट ॲकॅडमी आणि सागर कांबळे यांच्यावतीने कै. अभिषेक ठाकूर यांच्या स्मरणार्थ आयोजित 'अभिषेक ठाकूर करंडक' आंतरक्लब खुल्या गटाच्या ट्वेन्टी-२० क्रिकेट २०२४-२५ स्पर्धेत हेमंत पाटील संघ, स्केल-अप ॲकॅडमी ब, व्हि.एड्ज आणि २२ यार्डस् या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली. मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीच्या मैदानावर सुरू असलेल्या स्पर्धेत विराज दारवटकर याने केलेल्या कामगिरीच्या जोरावर व्हि-एड्ज संघाने ग्लोरी स्पोटर्स फाऊंडेशनचा ६ गडी राखून सहज पराभव केला. सामन्यातमध्ये विराज दारवटकर याने नाबाद ३० धावांची खेळी केली. राहूल नाईक याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर हेमंत पाटील संघाने स्केल-अप ॲकॅडमी अ संघाचा २६ धावांनी सहज पराभव केला. हेमंत पाटीच्या राहूल नाईकने २० धावांमध्ये ४ गडी बाद केले. अमन सय्यद याने केलेच्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर स्केल-अप ॲकॅडमी ब संघाने थर्डआय स्पोटर्स फाऊंडेशनचा ९ गडी राखून सहज पराभव केला. अमन याने ३ धावांमध्ये ३ गडी बाद करून अचूक गोलंदाजी केली. प्रसाद गुरव याने केलेल्या चकमदार गोलंदाजीमुळे २२ यार्डस् संघाने मिझुकी संघाचा ४ गडी राखून सहज पराभव केला. प्रसाद याने २१ धावांमध्ये ३ गडी बाद केले.

## क्रिकेट स्पर्धेत एचके लाईफ फिट क्रिकेट अकादमीचा विजय

**पुणे :** चॅम्प्स स्पोर्टस फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित चॅम्प्स करंडक १३ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत अखेरच्या साखळी फेरीत यश दराडे ८४ धावा) याने केलेल्या फलंदाजीच्या जोरावर एचके लाईफ फिट क्रिकेट अकादमीसंघाने टीएलबी रत्नागिरी क्रिकेट अकादमी संघाचा ६ गडी राखून पराभव केला. धायरी येथील सहारा क्रिकेट अकादमी व स्टार क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत अखेरच्या साखळी फेरीत प्रथम फलंदाजी करताना टीएलबी रत्नागिरी क्रिकेट अकादमी संघाने २५ षटकात ७ बाद १८४ धावा केल्या. यात नील जाधव ४१, शलवा महाजन ३१, रूद्र पांढरे १९, गणाधीश भट्टर १७ यांनी धावा केल्या. एचके लाईफ फिट क्रिकेट अकादमीकडून अवधूत लगाड(२-१०), अद्विक नानिवडेकर(२-२०) यांनी सुरेख गोलंदाजी केली. हे आव्हान एचके लाईफ फिट क्रिकेट अकादमी संघाने २३.३षटकात ४ बाद १८६ धावा करून पूर्ण केले. यात यश दराडेने ५९ चेंडूत १४ चौकारासह ८४ धावा, आर्य आंबेकर ३१ धावा, नील धडफले १८ धावा काढून संघाला विजय मिळवून दिला.



## क्रिकेट स्पर्धेत पुणे क्रिकेट क्लब संघाला विजेतेपद



**पुणे :** युवा पर्व फाउंडेशन व पवार फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित युथ करंडक १२ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत अंतिम फेरीत अथर्व कावळे १६ व ४-२४) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर पुणे क्रिकेट क्लब संघाने राजगड क्रिकेट क्लब संघाचा ७६ धावांनी पराभव करून विजेतेपद संपादन केले. राजगड स्पोर्टस अकादमी येथील क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत पहिल्यांदा खेळताना पुणे क्रिकेट क्लब संघाने ३७.१ षटकात सर्व बाद १७८ धावा केल्या. यात राजवीर राऊत ३२, क्रिशिव राव २८, अथर्व कावळे १६ यांनी धावा केल्या. राजगड क्रिकेट क्लब कडून अनुसया कबाडे(३-२४), आरुष चौधरी(२-३०), झियान पठाण(२-३३) यांनी सुरेख गोलंदाजी केली. याच्या उत्तरात राजगड क्रिकेट क्लब संघ ३४.३षटकात सर्व बाद १०२ धावावर संपुष्टात आला. यात रूद्र पाबळे २९, स्वस्तिक आरोळकर २७, सिमरन दाबस १४ यांनी दिलेली लढत अपुरी ठरली. विजयी संघाकडून अथर्व कावळे (४-१९), वेदांत शेळके(१-५); यांनी अचूक गोलंदाजी करत संघाला ७६ धावांनी विजय मिळवून दिला. स्पर्धेतील विजेत्या संघाला करंडक अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण महाराष्ट्र रणजी खेळाडू श्रीकांत काटे, पुणे स्पोटर्स गॅलॅक्सीचे संचालक रवींद्र चौधरी, राजगड क्रिकेट मैदानाचे संचालक योगेश नाना सातव यांच्या हस्ते करण्यात आले.

## क्रीकबेसिक क्रिकेट, फायटर्स ११ संघ विजयी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** बी अ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी यांच्या वतीने आयोजित बी अ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी करंडक १३ वर्षाखालील एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत क्रीकबेसिक क्रिकेट अकादमी, फायटर्स ११ क्रिकेट अकादमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी सलामी दिली.

चिखली येथील सिल्व्हर क्रिकेट क्लब क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत भुजंग धुळगुंडे(१२५धावा) याने केलेल्या धडाकेबाज शतकी खेळीच्या जोरावर क्रिकबेसिक क्रिकेट अकादमी संघाने बीअ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी क संघाचा २५ धावांनी पराभव करून विजयी सुरुवात केली.

दुसऱ्या लढतीत बुरतुकने कृष्णा (३-७) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर फायटर्स ११ क्रिकेट अकादमी संघाने बीअ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी अ संघाचा १९४ धावांनी धुव्वा उडवत शानदार सुरुवात केली.

## गोलंदाजांमध्ये बुमराह अव्वल स्थानावर

**नवी दिल्ली :** भारताचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह ९०८ गुणांसह आयसीसी कसोटी गोलंदाजी क्रमवारीत अव्वल स्थानावर आहे. फलंदाजी क्रमवारीत टॉप-१० मध्ये दोन भारतीयांचा समावेश आहे. त्याचवेळी वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या कसोटीत पाकिस्तानच्या विजयाचा फायदा नोमान अली आणि सौद शकील यांना झाला आहे. आयसीसीने बुधवारी आपली ताजी क्रमवारी जाहीर केली.

जसप्रीत बुमराह आयसीसी कसोटी गोलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थानावर आहे. बॉर्डर गावस्कर ट्रॉफीमध्ये ३२ विकेट्स घेत ९०७ गुणांचा टप्पा गाठणारा बुमराह पहिला भारतीय गोलंदाज ठरला. आता त्याला ताज्या कसोटी गोलंदाजांच्या क्रमवारीत ९०८ मानांकन मिळाले आहे. त्याच्या मागे ऑस्ट्रेलियाचा पॅट कमिन्स (८४१) दुसऱ्या स्थानावर आहे, तर दक्षिण आफ्रिकेचा कागिसो रबाडा ८३७ रेटिंगसह तिसऱ्या स्थानावर आहे.

## कायरा रैनाला दुहेरी मुकुट



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कायरा रैनाने योनेक्स-सनराईज पीवायसी एचटीबीए अमनोरा कप जिल्हा मानांकन सुपर-५०० बॅडमिंटन स्पर्धेत दुहेरी मुकुट मिळवला.

पीवायसी हिंदू जिमखाना येथे ही स्पर्धा झाली. कायरा रैनाने १३ वर्षांखालील मुलींच्या एकेरीचे आणि १५ वर्षांखालील गटाच्या दुहेरीचे विजेतेपद पटकावले. तिने जतिन सराफसह १५ वर्षांखालील गटाचे मिश्र दुहेरीचे विजेतेपद पटकावल्यानंतर १३ वर्षांखालील गटात बाजी मारली. अग्रमानांकित कायराने गार्गी कामठेकरला २१-९, २१-१२ असे पराभूत केले. स्पर्धेतील ११ वर्षांखालील मुलींच्या गटाच्या एकेरीच्या अंतिम फेरीत अग्रिमा राणाने निधी गायकवाडला २१-८, २१-१० असे नमविले. ११ वर्षांखालील मुलांच्या गटात अर्चित खान्देशेने वेदांत मोरेला १५-२१, २१-१०, २१-११ असे पराभूत केले.

स्पर्धेतील १९ वर्षांखालील मुलांच्या एकेरीत प्रायन महाशब्देने विजेतेपद पटकावले. प्रायनने अगस्त्य कुंदन तितारवर १६-२१, २३-२१, २१-१६ असे पराभूत केले.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ पीवायसी हिंदू जिमखाना येथे झाला. यावेळी हवेली तालुका बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष अविनाश जाधव, पीवायसी चे सचिव दीपक गाडगीळ, तन्मय आगाशे, सारंग लागू, अभिजीत चांदगुडे, सिद्धार्थ पळणीटकर उपस्थित होते. यावेळी कायरा रैना, ओजस जोशी यांना २५ हजार रुपयांची शिष्यवृत्ती आणि चिन्मय फणसे याला ५० हजार रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात आली.

## 'एसएफए फुटबॉल टूर्नामेंट' मध्ये ध्रुव ग्लोबल स्कूल ३ ऱ्या स्थानावर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** एसएफए फुटबॉल टुर्नामेंटमध्ये नांदे येथील ध्रुव ग्लोबल स्कूलच्या फुटबॉल खेळाडूंनी विजयाने सुरुवात केली. शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी येथे झालेल्या एकतर्फी सामन्यात ध्रुव ग्लोबल स्कूलच्या खेळाडूंनी लॉयोला हायस्कूलवर २-० च्या विजयासह तिसऱ्या स्थानासाठी सामना जिंकला. खेळाडू आरव चौधरी व श्रीजन वर्मा यांनी गोल केला. ध्रुवच्या खेळाडूंनी प्रेक्षकांना ही विजयाची भेट देऊन टाळ्यांचा कडकडाट केला. खेळाडूंचा जोश आणि चिकाटी पाहून ध्रुव ग्लोबल स्कूलचे संचालक यशवर्धन मालपाणी व प्रिन्सिपल संगीता राऊतजी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्यात.

सामन्यातील पहिल्या हाफ च्या २५' व्या मिनिटाला ध्रुव ग्लोबल स्कूलचा खेळाडू आरव चौधरी याने गोल करून संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. पहिल्या सत्रात ध्रुव स्कूलच्या खेळाडूंनी ही आघाडी कायम ठेवली. दुसऱ्या सत्रातही ध्रुव च्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी सुरू ठेवली. २९' व्या मिनिटाला श्रीजन वर्मा याने गोल करत संघाची आघाडी २-० अशी वाढवली व विजय निश्चित केला.

ध्रुव ग्लोबल स्कूलच्या फुटबॉल टीम मध्ये समनमय गुप्ता, आरव चौधरी, कबीर बिजूर, आयुष गाडवे, अर्जुन विजयेंद्रन, नमिष सिंह, श्रीजन वर्मा आणि नरेन प्रसाद यांचा समावेश होता. या खेळाडूंनी आपल्या चिकाटीच्या जोरावर यश मिळविले. या खेळाडूना समर्पित प्रशिक्षक अमेय कलाटे आणि पार्थ सायकिया यांचे मार्गदर्शन लाभले.

## टीम इंडियाचे स्टार घरच्या मैदानावरही नापास

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारत-ऑस्ट्रेलिया बॉर्डर गावस्कर ट्रॉफी २०२४-२५ भारतीय संघासाठी एखाद्या वाईट स्वप्नासारखी ठरली. संपूर्ण मालिकेत भारताची फलंदाजी फळी धावा करण्यात अपयशी ठरली. या मालिकेनंतर भारतीय संघाच्या बऱ्याच खेळाडूंनी देशांतर्गत क्रिकेट खेळण्याचा निर्णय घेत, २३ जानेवारीपासून सुरू झालेल्या या रणजी ट्रॉफीच्या एलिट गट सामन्यांमध्ये खेळताना दिसत आहेत. रोहित शर्मा १० वर्षांनी रणजी सामना खेळायला उतरला आहे. मुंबईच्या संघात ६ भारताचे खेळाडू खेळत आहेत.

ऑस्ट्रेलियानंतर घरच्या मैदानावरही भारताचे खेळाडू नापास झाले आहेत. रोहित शर्मा, यशस्वी जैस्वाल, ऋषभ पंत, शुबमन गिल हे खळाडू आपला फॉर्म परत मिळवण्यासाठी रणजी सामन्यात खेळण्यासाठी उतरले खरे पण मोठी कामगिरी करू शकले नाहीत. रोहित शर्मा ३ धावांवर, ऋषभ पंत १ धाव करून, यशस्वी जैस्वाल ४ धावा करून तर शुबमन गिलही ४ धावा करत माघारी परतले. तर श्रेयस अय्यर ११ धावा करत बाद झाला. पण श्रेयस अय्यरने ७ चेंडूत एक षटकार आणि एका चौकारासह ११ धावा करत आपला फॉर्म दाखवून दिला. पण जम्मू काश्मीरच्या भेदक गोलंदाजीपुढे मुंबईचा हा स्टार खेळाडू बाद झाला.

## राष्ट्रीय सब ज्युनिअर ज्यूदो स्पर्धेत मणिपूर विजेता; हरियाणा उपविजेता !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुनीत बालन ग्रुप आणि इन्स्पायर इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट प्रस्तुत राष्ट्रीय सब ज्युनिअर स्पर्धेचे विजेतेपद चार सुवर्ण चार रौप्य आणि पाच कांस्यपदके मिळवून मणिपूर राज्याचा संघ विजेता ठरला तर चार सुवर्ण चार रौप्य आणि एक कांस्यपदक घेऊन हरियाणा राज्याचा संघ उपविजेता ठरला. मणिपूर राज्याची ५२ किलो खालील गटामध्ये खेळणारी लालचेन बी हिने "स्वर्गीय आमदार सौ मुक्ता टिळक स्मृती चषक" यावर आपले नाव कोरले.

आज झालेल्या स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघातील ५७ किलोवरील गटात खेळणारी कोल्हापूरच्या गीतिका जाधवने आणि ६६ किलोखालील गटात नांदेडच्या नागेश लुटे या दोघांनी रौप्यपदक जिंकले.

नाशिकची ५२ किलोखालील गटात खेळणारी ईश्वरी क्षीरसागर हिने कांस्यपदक पटकावले. काल झालेल्या स्पर्धेत आपल्या राज्यातील पौर्णिमा सातपुते, राजवी तळोकार आणि वेदांत पारधी या तीनही यवतमाळच्या खेळाडूंनी कांस्य मिळवले होते.

## राष्ट्रीय टेनिस स्पर्धा: नितीन किर्तने, संदीप पवार, मंदार वाकणकर, अजय कामत,

# भूषण अकूत यांची दुहेरी मुकूटाकडे वाटचाल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** सोलारीस क्लब, ग्लोबल वरिष्ठ टेनिस संघटना (जीएसटीए) आणि रविंद्र पांड्ये टेनिस ॲकॅडमी (आरपीटीए) यांच्या संयुक्त विद्यमाने तर्फे आयोजित अकराव्या 'सोलारीस करंडक' वरिष्ठ पुरूष राष्ट्रीय टेनिस २०२५ स्पर्धेत पुण्याच्या नितीन किर्तने, मंदार वाकणकर, अजय कामत आणि मुंबईच्या संदीप पवार, भुषण अकूत यांनी एकेरी आणि दुहेरीच्या गटाच्या अंतिम फेरीत दाखल होऊन दुहेरी मुकूटाकडे वाटचाल केली आहे.

मयुर कॉलनी येथील सोलारीस क्लब येथे सुरू असलेल्या स्पर्धेत ३५ वर्षावरील गटामध्ये मुंबईच्या आणि अग्रमानांकित संदीप पवार याने पुण्याच्या ज्ञानेश्वर पाडाळे याचा ६-३, ६-४ असा सहज पराभव केला. व्दितीय मानांकित निरज आनंद याने अजिंक्य पाटणकर याचा ६-२, ६-१ असा सहज पराभव करून अंतिम फेरी गाठली. ४५ वर्षावरील गटात चौथ्या मानांकित मंदार वाकणकर याने केतन जठार याचा ६-२, ६-१ असा सहज पराभव केला. व्दितीय मानांकित नितीन किर्तने याने जिग्नेश तिंबाडीया याचा ६-१, ६-१ असा सहज पराभव करून अंतिम फेरी गाठली. ५५ वर्षावरील गटात अग्रमानांकित अजय कामत याने अर्जुन वाघमारे याचा ६-०, ६-० असा तर, व्दितीय मानांकित भुषण अकूत याने रणजीत चव्हाण याचा ६-०, ६-० असा पराभव केला.

दुहेरीमध्ये ३५ वर्षावरील गटात उपांत्य फेरीमध्ये संदीप पवार व देवेंद्र पिवळ या जोडीने रवि कोठारी व नितीन सावंत यांचा ७-६(४), ६-४ असा संघर्षपूर्ण पराभव केला. गणेश देवकिले आणि वैभव अवघडे यांनी रविंद्र पांड्ये व गिरीष मिश्रा या जोडीचा ६-२, ६-२ असा सहज पराभव करून अंतिम फेरी गाठली. ४५ वर्षावरील गटात मंदार वाकणकर व मदन गोखले यांनी गिरीष कुकरेजा व सचिन माधव यांचा ६-१, ६-३ असा तर, नितीन किर्तने व असित सैफ यांनी संजय गडवानी व जितेन गादीया या जोडीचा ७-५, ६-० असा पराभव करून अंतिम फेरीतील आपले स्थान निश्चित केले. ५५ वर्षावरील गटात अजय कामत व रामा राजू यांनी राजिव अरोरा व ए.एस.राजु या जोडीचा ६-३, ६-३ असा पराभव केला.